बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक १३ | बुधवार,दि.०८ मार्च २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

देवरी तहसील कार्यालयातील अपहार प्रकरणात तहसीलदारांवरील कार्यवाही गुलदस्त्यात

गोंदिया: सन २००४ ते २९१४ या १० वर्षाच्या कालावधीत गोंदिया जिल्ह्यातील देवरी तहसील कार्यालयात १२ तहसीलदारांच्या बेजबाबदारपणामुले तीन कर्मचाऱ्यांनी ७ कोटी २९ लाख रुपयांच्या शासकीय रकमेचा अपहार केल्याचे प्रकरण उघडकीस आले होते.त्या प्रकरणात माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी तक्रार करुन चौकशीची मागणी केली होती.त्यानंतर २०१७ मध्ये तत्कालीन मुलूंडचे (मुंबई) आमदार सरदार तारासिंग यांनी अधिवेशनात लक्षवेधी लावून चौकशीची मागणी केली होती. त्यानंतर राज्य सरकारने विभागीय चौकशीचे आदेश दिले होते.त्याप्रकरणाला पाच वर्षाचा काळ लोटून सुध्दा या प्रकरणात फक्त दोन कर्मचाऱ्यांना निलबिंत करण्यात आले.मात्र ज्या १२ तहसीलदारांच्या कार्यकाळात हा अपहाराचा प्रकार घडला,त्यापैकी एकाही तहसीलदारावर जिल्हाधिकारी,विभागीय आयुक्तासह मंत्रालयातील सचिवांनी कारवाई करण्याची हिमंत दाखवलेली नाही.यावरुन वरच्या पातळीवरील वरिष्ठ अधिकारी हे फक्त कनिष्ठ कर्मचाऱ्यावर कारवाई करुन मोकळे होत असल्याचे या प्रकारावरुन दिसून आले आहे.

या प्रकरणात देवरीचे तत्कालीन नाझर विष्णुशंकर गुट्टे, ना. नाझर आर.एस. आगरे व कनिष्ठ लिपीक सुनील वैरागडे या मुख्य आरोपींनी अपहार केल्याचे दिसून आले होते.७ कोटी २९ लाख,३६ हजार ४३९ रुपयाच्या निधीतील २९ लाख ३६ हजार ४३९ रुपयाचा अपहार झाल्याचे चौकशी समितीने म्हटले आहे.त्यानुसार ज्या १२ तहसीलदारांच्या कार्यकाळात हा अपहार झाला,त्या तहसीलदारांसह नाझर,आस्थापनी लिपिकाविरुध्द माहिती अधिकार कार्यकर्ते सुरेश दुरुगकर यांनी देवरी पोलीस स्टेशन येथे १४ फेबुवारी २०१८ मध्ये तक्रार करुन कलम ४०६,४०९,१७७,३४ भांदवी अन्वये कारवाई करण्याची मागणी केली होती.मात्र त्या तक्रारीवर पोलीस विभागाने अजूनही कारवाई केलेली नाही,तसेच विभागीय आयुक्तांनीही संबधित तहसिलदारांवर कारवाई केली नसल्याचे दुरुगकर यांनी म्हटले आहे. त्यांच्यावर तेव्हाच निलंबनाची कारवाईसुद्धा झाली. पण १० वर्षाच्या कार्यकाळात ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन तब्बल ७ कोटी २९ लाख रुपयांच्या अपहारासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठबळ दिले. त्यांच्यावर मात्र अद्यापही कारवाई झालेली नाही.

नैसर्गिक आपत्तीसाठी शेतकऱ्यांना मिळणारी मदत, संजय गांधी निराधार योजना, रजा रोखीकरण अशा अनेक योजनांमध्ये तसेच टीए-डीए बिल आणि डबल बिल टाकून प्रत्यक्ष लार्भाथ्यांना लाभ न देता ती रक्कम आपल्या खात्यात वळती करुन तसेच सरकारी खात्यातून रोख रक्कम काढून हा अपहार करण्यात आला. या प्रकरणात कनिष्ठ कर्मचाऱ्यांनी रक्कम काढताना तत्कालीन तहसीलदारांनी कोणतीही विचारपूस न करता बेजबाबदारपणे चेकवर सह्या केल्या. त्यामुळे त्यांचाही या अपहारात सहभाग असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.वित्त मंत्रालयाच्या चौकशीनंतर विभागीय आयुक्तांच्या आदेशावरुन गोंदियाचे तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकारी मंगेश मोहिते यांनी फेरचौकशी केली होती.

नायब तहसीलदार आणि त्यापेक्षा मोठ्या हुद्यावरील अधिकाऱ्यांच्या चौकशीचा निर्णय राज्य शासनाला घ्यावा लागतो. त्यानुसार शासनाने संयुक्त विभागीय चौकशीचे करण्याचे आदेश विभागीय आयुक्यांमार्फत जिल्हाधिकारी गोंदिया यांना दिले होते.विशेष म्हणजे काही अधिकारी आता सेवानिवृत्तही झाले आहेत.मात्र ही चौकशी अद्यापही गुलदस्त्यातच असल्याने वरिष्ठांचे या तहसीलदारांना पाठबळ मिळाल्याचे बोलले जात आहे.

या तहसीलदार, एसडीओची चौकशी

प्रवीण फुलारी-२००३-०७
बी.ई. फुलसुंगे-२००७
अरविंद निमजे-२००७-०८
पी.एस.मेश्राम-२००८-०९
रामकृष्ण कुंभरे-२००९
संतोष महाले-२००९
मोहन जाधव-२००९
प्रवीण साळुंखे-२००९-१०
स्वरुप कंकाळ-२०११
प्रताप वाघमारे-२०१२-१३
आर.डी.पटले(प्र.)-२०१३-१४
रवींद्र चव्हाण-२०१४-१५

फक्त दोन कर्मचारी निलंबित

या प्रकरणात एसडीओ व तहसीलदारांना अभय देत फक्त कनिष्ठ कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत. यामध्ये नायब नाझर एन.एस.गुट्टे व आस्थापना लिपीक एस.के.वैरागडे यांना निलंबित करण्यात आले आहे.

कोअर झोनमधील हॉलिडे होम हटविण्याची मागणी

गोंदिया: नवेगाव-नागझिरा अभयाण्यालगत असलेल्या गावांमध्ये वन्यप्राण्यांचा वावर वाढला असून वन्यप्राण्यांच्या मानवावरील हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या मागील मुख्य कारण म्हणजे वन्यप्राण्यांच्या अधिकार धोक्यात आला असून त्यांच्या अधिवासाच्या क्षेत्रात माणसांची वर्दळ वाढल्याने ते गावाकडे धाव घेत असल्याची बाब पुढे आली आहे.

नवेगावबांध-नागझिरा अभयारण्य अस्तित्वात आल्यानंतर यानंतर या क्षेत्रात कोअर व बफर क्षेत्र घोषित करण्यात आले. अभयारण्याच्या क्षेत्राबाहेरील क्षेत्र बफर झोन म्हणून घोषित करण्यात आले. यात गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील ३० गावे, सडक अर्जुनी ९८, देवरी ८९, अर्जुनी मोरगाव २७ व भंडारा जिल्ह्यातील भंडारा तालुक्यातील ३१ गावे, साकोली तालुक्यातील ४१ गावे, लाखनी तालुक्यातील ३४७ गावे संवेदनशील म्हणून घोषित केली. नागझिरा अभयारण्याच्या मध्यभागी फार जुन्या मालगुजारी तलाव असून या परिसरात थाटेझरी हे गाव होते. वनविभागाने या गावचे दुसऱ्या ठिकाणी पुनर्वसन केले. विशेष म्हणजे नागझिरा अभयारण्यात कोअर झोनमध्ये तत्कालीन वनमंत्री छेदीलाल गुप्ता यांच्या कार्यकाळात या ठिकाणी हॉलीडे होम तयार करण्यात आले होते.

पर्यटकांसाठी सुविधा म्हणून या हॉलीडे होमची निर्मिती करण्यात आली होती. जवळपास कोअर झोनमध्ये ३५ रुम तयार करण्यात आले आहे. हे हॉलीडे होम अद्यापही सुरु असून या ठिकाणी पर्यटकानासाठी जिप्सीची सुविधा आहे. जवळपास १५० ते २०० काम करणारे लोक ठिकाणी राहत असल्याने वन्यप्राण्यांचा अधिवास हा धोक्यात आला आहे. परिणामी अलीकडे वाघ, बिबट व इतर वन्यप्राणी गावाच्या दिशेने धाव घेत असल्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

ही बाब वन व वन्यजीव विभागाच्या निदर्शनास वारंवार आणून देण्यात आली. पण अद्यापही यावर कसलीच उपाययोजना करण्यात आली नाही. त्यामुळे समस्या कायम आहे.

कोअर झोनमधील हॉलीडे होम बंद करा

हॉलीडे होममुळे व परिसरात राहणाऱ्या काम करणाऱ्या लोकांमुळे वन्यप्राण्यांच्या अधिवासाला धोका निर्माण झाला आहे. वन्यप्राणी गावच्या दिशेने ाव घेत आहेत. तर वन व वन्यजीव विभागाच्या चमूने सुद्धा आक्षेप नोंदविला आहे. त्यामुळे या सर्व गोष्टीची दखल घेता कोअर झोनमधील हॉलीडे होम बंद करुन ते गेटच्या बाहेर स्थापन करण्याची मागणी आहे.

वनमंत्र्याचे वेधले लक्ष

याच विषयाला घेऊन माजी जि.प.सभापती अशोक लंजे, जि.प.सदस्य भुमेश्वर पटले यांनी राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन कोअर झोनमधील हॉलीडे होम बंद करण्याची मागणी केली. तसेच नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वाघ, वाघिणीची जोडी लवकर सोडण्याची मागणी केली होती.

नव्या पाहुण्यांच्या आगमनाची प्रतीक्षा

नवेगाव-नागझिरा प्रकल्पात पाच वाघ सोडण्यात येणार आहे. यात पहिल्या टप्प्यात एक वाघ आणि एक वाघीण सोडण्यात येणार असून त्यासाठीची तयारी वन्यजीव विभागाने पूर्ण केली आहे. दोन दिवसांपुर्वीच वन्यजीव विभागाने याचे संकेत दिले होते. त्यामुळे या क्षेत्रात नवीन पाहुण्यांची सर्वांनाच प्रतीक्षा आहे.

ओबीसी सेवा संघाचे तिसरे अधिवेशन १२ मार्चला गोरेगाव येथे

गोरेगाव: ओबीसी सेवा संघाचे तिसरे अधिवेशन रविवार १२ मार्चला गोरेगाव येथील गुरुकृपा लॉन येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन अप्पर आयुक्त आयकर विभाग नागपूरचे धनंजय वंजारी यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे सत्राध्यक्ष ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष इंजि. प्रदीप ढोबळे हे आहेत. तर स्वागताध्यक्ष ओबीसी सेवा संघाचे तालुकाध्यक्ष आर.आर.अगडे हे आहेत. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ओबीसी सेवा संघाचे केंद्रीय सदस्य डी.ए.दळवी, राज्य उपाध्यक्ष भैय्याजी लांबट भंडारा, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे प्रा.शेषराव येलेकर,सहयोग ग्रुप ऑफ स्कूलतचे संचालक जे.के.लोखंडे, ओबीसी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.बी.एम.करमकर, ओबीसी संघर्ष कृती समिती गोरेगावचे उपेंद्र कटरे, राष्ट्रीय ओबीसी कर्म-अधिकारी महासंघ गोरेगावच `शंकर चव्हाण उपस्थित राहणार आहेत.या सत्राचे संचालन इंजि. भुमेश ठाकरे, तर आभार ओबीसी सेवा संघ गोरेगावचे सचिव डॉ. श्याम फाये मानणार आहेत. दुसऱ्या सत्रात मंडल आयोग नाचिअप्पन आयोग-स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसी, क्रिमीलेअर अट, महाज्योती संस्था व राज्यकर्त्यांची भूमिका या विषयावर असून ओबीसी सेवा संघाचे राज्य संघठन सचिव सावन कटरे भुमिका मांडणार आहेत. तर मार्गदर्शक म्हणून स्टुडंट राईट्स फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष उमेश कोर्राम,ओबीसी सेवा सघाचे जिल्हा संघटक डॉ. गुरुदास येडेवार, समाज सेविका ॲड.सविताताई बेदरकर तर सत्राध्यक्ष म्हणून ओबीसी संघर्ष कृती समितीचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरे राहणार आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रीय ओबीसी महासंघ गोंदियाचे जिल्हाध्यक्ष मनोज मेंढे,राष्ट्रीय ओबीसी कर्म.अधि. महासंघ गोंदियाचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके, ओबीसी महिला संघ गोंदियाच्या जिल्हाध्यक्ष पुष्पाताई खोटेले, राष्ट्रीय ओबीसी कर्म.महासंघ गोरेगावचे तालुका सचिव उमेश रहांगडाले, नागपूरचे ॲड. योगेश पारधी उपस्थित राहणार आहेत.या सत्राचे संचालन संयोजक हरिराम येरणे, तर आभार कार्याध्यक्ष रामेश्वर बागडे मानणार आहेत.या अधिवेशनाला जिल्ह्यातील ओबीसी बांधवानी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ओबीसी सेवा सघाच्यावतीने करण्यात आले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पटोले यांच्या भावासह पाच जणांवर अखेर गुन्हा दाखल

डॉ.साळवे यांचे अपहरण प्रकरण

गडचिरोली : काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे भाऊ विनोद पटोले यांच्यासह पाच व्यक्तींवर डॉ. प्रमोद साळवे यांना गडचिरोली-चातगाव मार्गावरील बोदली गावाजवळ त्यांची गाडी अडवून अपहरण , मारहाण व शिवीगाळ केल्याच्या आरोपावरून गडचिरोली पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड संहिता कलम ३४१, १४३, ५०४, ५०६ अंतर्गत सोमवार ६ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

डॉ. प्रमोद साळवे यांची बहिण अल्का रामणे यांच्या नावाने धानोरा तालुक्यातील कटेझरी येथे असलेल्या राईस मिलची खरेदीचा तोंडी सौदा जेसा मोटवानी रा. देसाईगंज यांच्या मध्यस्थीने ५१ लाख रुपयांत करून रजिस्ट्री करण्याचा ठराव केला होता. दरम्यान, विनोद पटोले यांनी टप्प्याटप्प्याने २० लाख रुपयांचा धनादेश दिला. मात्र, सहा महिन्यांची मुदत उलटून गेल्यानंतर त्यांनी मील व जमिनीबाबत कोणताही व्यवहार नसल्याने वारंवार विचारणा केली. परंतु, विनोद पटोले यांच्याकडून सकारात्मक विचार दिसून न आल्याने त्यांना वकिलामार्फत १६ जानेवारीला नोटीस पाठवून व्यवहार करा, अन्यथा सौदा रद्द झाला असे समजण्यात येईल व सौद्यापोटी देण्यात येणारी रक्कमही परत देण्यात येणार नाही, अशा आशयाची नोटीस विनोद पटोले यांना देण्यात आली. ३ मार्च रोजी दुपारी ४ वाजताच्या दरम्यान डॉ. साळवे आपल्या गाडीसह चातगाववरून गडचिरोलीकडे कामासाठी येत असताना, बोदली राईस मिलजवळ मागेहून भरधाव वेगाने वाहन क्रमांक एमएच ३१ एफई ९०९७ अचानक समोर येऊन थांबली.

या गाडीत पाच व्यक्ती होते. त्यांनी गाडीतून उतरून धमकी देऊन आपल्याला शिवीगाळ व अपहरणाचा प्रयत्न केला. यात विनोद पटोले यांच्यासह आरमोरी येथील काँग्रेसचे युवानेते छगन शेडमाके, माजी पोलीस अधिकारी दामदेव मंडलवार, नागपूर येथील सुमित कोठारी यांचा समावेश होता. त्यांनी राईस मिल आपल्या नावाने करून दिली नाही तर मकाट डालूंगा, मार डालूंगाफअशी धमकी दिली. तर सुमित कोठारी यांनी मराईस मिल जला देंगेफ व छगन शेडमाके यांनी मराईस मिलके साथ इसको भी जला दोफ अशी धमकी दिली. यावेळी दामदेव मंडलवार यांनी मोठ्याने ओरडून मगाडीत बसाफ असे म्हणाले. सदर घटनेमुळे घाबरुन सोबत असलेल्या साथीदारांच्या मदतीने सरळ गडचिरोली पोलीस स्टेशन गाठून याबाबत रिपोर्ट दाखल केली होती. या तक्रारीवरुन पोलिसांनी सुमित कोठारी, विनोद पटोले, छगन शेडमाके, दामदेव मंडलवार व एक अनोळखी व्यक्ती अशा पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून सदर व्यक्तींना पोलीस अटक कधी करतात, याकडे लक्ष लागले आहे.

काँग्रेसच्या दबावानंतरही पोलिसांकडून गुन्हा दाखल

सदर प्रकरणातील विनोद पटोले हे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे मोठे भाऊ असून ते सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक होते. तर, छगन शेडमाके काँग्रेसचे युवानेते असल्याने काँग्रेसच्या वरिष्ठ पातळीवरून पोलिसांवर गुन्हा दाखल करू नये, म्हणून प्रचंड दबाव असल्याची माहिती होती. तरीही पोलीस अधीक्षक यांनी याप्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षकांना तत्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्यामुळे यापुढे गुन्हेगारीला निश्चितच आळा बसून सामान्य जनतेला न्याय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दिव्यांग मुलांना लोकली मेड साहित्य देण्याकरिता मोजमाप शिबिराचे आयोजन

गोंदिया: जिल्हयातील अस्थिव्यंग, मतिमंद, सेरेब्रल पाल्सी व बहुविकलांग असलेल्या दिव्यांग मुलांना लोकली मेड साहित्य देण्याकरिता के. टी. एस. जिल्हा सामान्य रुग्णालयात असलेल्या जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्रातील तज्ञांच्या मार्गदर्शनात मोजमाप शिबिराचे आयोजन दिनांक ९ ते ११ मार्च २०२३ या कालावधी मध्ये बाई गंगाबाई रुग्णालयात करण्यात आले असल्याची माहिती समग्र शिक्षा च्या दिव्यांग विभागाने जिल्हा समन्वयक विजय ठोकणे यांनी दिली आहे.

दिव्यांग मुलांचे स्नायू ताठरले असल्यामुळे त्यांना दैनंदिन जीवनात तसेच शालेय शिक्षण घेतांना अडचणी येतात. त्यामुळे ही अडचण दुर करण्यासाठी त्यांना त्यांच्या शारीरिक क्षमतेनुसार व गरजेनुसार मोजमाप करून साहित्य दिल्यास फार मोठी मदत अश्या मुलांना होतें.

याच अनुषंगाने येत्या ९ तारखे पासून तीन दिवस जिल्हयातील १५९ मुलांच्या करीता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यात ९मार्च रोजी आमगाव, अर्जुनी/मोरगाव व देवरी तालुक्यांची लाभाथी येतील, १० मार्च ला गोंदिया व गोरेगांव तर ११ मार्च ला सालेकसा, सडक/अर्जुनी व तिरोडा चे विद्याथी उपस्थित राहणार आहेत. शिबिरात शासकीय रुग्णालयाच्या फिजिओथेरपिस्ट डॉ.कांचन भोयर व डॉ.प्रगती मनोहर सेवा देणार आहेत. सदर शिबिर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अमरीश मोहबे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. महेन्द्र गजभिये यांच्या मार्गदर्शनात पार पडणार असल्याची माहिती जिल्हा समन्वयक विजय ठोकणे व पारस लोणारे व अजित सिंह यांनी दिली आहे.

अवकाळी पावसाने फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे त्वरित करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई: राज्यामध्ये अनेक जिल्ह्यांत अवकाळी पावसामुळे पिकांना फटका बसला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्य सचिव तसेच जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून त्यांच्याकडून परिस्थितीची माहिती घेतली तसेच तातडीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळाला पाहिजे. संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या सरकार पाठीशी आहे . यादृष्टीने महसूल यंत्रणेने लगेच कामाला लागावे व पंचनामे करावेत असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले ठाणे, पालघरसह राज्यातल्या महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस झाला.

राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम रॅकिंगमध्ये गोंदिया राज्यात पहिला

गोंदिया:- गतवर्षी जून महिन्याच्या आरोग्य संचालनायाच्या प्रसिद्ध तक्ता मध्ये गोंदिया राज्यात पाचव्यास्थानी होता.मात्र सन २०२२-२३ वर्षांमध्ये गोंदिया जिल्ह्याने विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या रँकिंगमध्ये ऑक्टोबंर २०२२ पासुन सातत्य राखत गेल्या ५ महिन्यांपासुन राज्यात प्रथम क्रमांक राखण्यात यश मिळविले आहे.महाराष्ट्र शासन आरोग्य सेवासंचालनाया तर्फे दर महिन्याला जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि महापालिकेचे वैद्यकिय अधिकारी अशा तीन गटांतील कामगिरीचा आढावा घेवून विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचे रँकिंग करण्यात येते.

गत फेब्रुवारी महिन्याच्या कामगिरीच्या आधारे संचालकाच्या पत्रानुसार गोंदियाने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. व्दितीयस्थानी नागपुर तर तृतीयस्थानी सांगली जिल्ह्याचे स्थान आहे. आरोग्य विभागाच्या कामगिरी बद्दल जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड यांनी कौतुक केले असून पुढेही असेच सातत्य राखुन नागरिकांना दर्जेदार व गुणात्मक सेवा देण्याचे सांगितले.माता व बालकांना पाठोपाठ इतर विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची नागरिकांना गुणवत्ता पूर्ण सेवा देण्यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासन मेहनत घेत आहे.जिल्ह्याची सीमा मध्यप्रदेश व छत्तीसगडला लागुन आहे.जिल्ह्याला लागुन गडचिरोली व भंडारा जिल्हे आहेत.आदिवासी,नक्षलग्रस्त व जंगलव्याप्त दुर्गम अशी जिल्ह्याची ओळख आहे.

विविध आजार बळावलेले असतात.आरोग्य कर्मचाऱ्यांच्या जागा मोठ्या प्रमाणावर रिक्त असताना ही जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश सुतार यांच्या सह आरोग्य विभागाच्या चमूने नियोजनबद्ध कार्यक्रम राबवुन हे यश संपादन केल्याचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड यांनी सांगीतले.

जिल्हा,तालुका व प्रत्यक्ष प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जावुन सभा घेण्यात येत असल्याने कर्मचाऱ्यांच्या विविध राष्ट्रीय आरोग्य निर्देशांकावर सुधारणा करण्यावर भर देण्यात येतो.विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांबाबत महिना निहाय मासिक सभा,आभासी बैठका घेऊन दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिलेल्या सूचना कामी येत असल्याचे डॉ.नितीन वानखेडे यांनी सांगीतले.

प्रभावीपणेसेवा देण्यावर भर-पुंड

आरोग्य विभागाने नियोजन पूर्वक सातत्य राखून अविरत काम केल्याचे फलीत आहे.येत्या काळात लोक सहभागातून आणखी प्रभावीपणे सेवा देण्यावर आमचा भर राहील.आरोग्य व्यवस्थापन व माहिती पद्धती अंतर्गत सर्व माहिती पोर्टलवर विहित कालमर्यादेत भरण्यावर जोर देण्यात येणार असल्याचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड यांनी सांगीतले.

अग्नीवीरमध्ये भरती होण्यासाठी १५ मार्च पर्यंत ऑनलाईन नोंदणी करा-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे

- प्रथम परीक्षा, नंतर शारीरिक चाचणी
- जॉईन इंडियन आमी संकेतस्थळावर अर्ज करा

गोंदिया : अग्नीवीर सैन्यदल भरतीसाठी पूर्वी शारीरिक चाचणी व त्यानंतर लेखी परीक्षा घेतली जायची. मात्र, यंदाच्या भरती प्रक्रियेत आधी लेखी परीक्षा आणि त्यानंतर शारीरिक चाचणी घेतली जाणार आहे. अर्ज करण्याची शेवटची १५ मार्च ही तारीख असून गोंदिया जिल्ह्यातील तरुण तरुणींना सैन्यात भरती होण्याची ही सुवर्ण संधी असल्याची माहिती जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी दिली.

अग्नीवीर भरती संदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गोतमारे बोलत होते. यावेळी नागपूर येथील सैन्यदल भरती केंद्राचे कर्नल आर. जगथ नारायण, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ. शिल्पा खरपकर उपस्थित होते.

अग्नीवीर भरती ऑनलाईन अर्ज प्रकिया www.joinindianarmy.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. नावनोंदणी १६ फेब्रुवारी ते १५ मार्च या दरम्यान अर्ज करण्यासाठी संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज करावा. परीक्षा १७ एप्रिल ते ०४ मे या कालावधीत होणार आहे. नागपूर व अमरावती येथे परीक्षा केंद्र असणार आहे. परीक्षेचा निकाल २० मे रोजी घोषीत होणार आहेत असे त्यांनी सांगितले.

विदर्भातील नागपूर, वर्धा, वाशीम, अमरावती, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, अकोला व यवतमाळ या जिल्ह्यांचा यामध्ये समावेश आहे. या पदभरतीच्या माध्यमातून अग्निवीर (जनरल ड्युटी), अग्निवीर (टेक्निकल), अग्निवीर (क्लर्क, स्टोअर किपर टेक्निकल), अग्निवीर ट्रेडसमन दहावी पास, अग्निवीर ट्रेडसमन आठवी पास ही पदे भरली जाणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील तरुणांना औरंगाबाद येथील भरतीमध्ये सहभागी होता येणार आहे. पाच जुलै ते ११ जुलैदरम्यान रॅलीचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. सैन्यदलाच्या माध्यमातून देशसेवेची संधी मिळणार आहे. त्यामुळे या भरती प्रक्रियेत अधिकाधिक तरुणांनी अर्ज करीत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारयांनी यावेळी केले.

नागपूर येथील सैन्यदल भरती केंद्राचे कर्नल आर. जगथ नारायण यांनीही यावेळी भरती प्रक्रियेविषयीची माहिती दिली. गेल्यावर्षी नागपूर जिल्ह्यात झालेल्या भरतीमध्ये साठ हजार तरुण सहभागी झाले होते. यापैकी सुमारे एक हजार युवकांची अग्निवीर भरतीमध्ये निवड करण्यात आली होती. या भरती प्रक्रियेला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. यंदाच्या भरतीसाठी आतापर्यंत सुमारे पाच हजार तरुणांनी नाव नोंदणी केली असल्याचे त्यांनी सांगितले.

जॉईन इंडियन आमी संकेतस्थळावर अर्ज कसा करावा याबाबत व्हिडीओ आहे तो काळजीपूर्वक पहावा व त्यानुसारच अर्ज करावा. त्याचप्रमाणे पदनिहाय प्रश्नपत्रिकांचे नमुने सुद्धा या संकेतस्थळावर दिलेले आहेत याचा उपयोग अभ्यासासाठी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. युवक युवती अर्ज करण्यासाठी नागपूर येथील सैन्यदल भरती केंद्रात आल्यास त्यांना अर्ज भरण्यासाठी मदत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ही सगळी प्रक्रिया ऑनलाईन असून यासाठी कोणालाही पैसे देण्याची गरज नाही असे ते म्हणाले. तरुणांनी कुणाच्याही आमिषाला बळी पडू नये असे आवाहन त्यांनी केले.

विदर्भातील सर्व जिल्ह्यातील (बुलढाणा वगळून) जास्तीत जास्त युवकांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा व आपली ऑनलाईन नाव नोंदणी वेळेच्या आत करून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

संपादकीय

स्त्री स्वातंत्र्याचा समाजाने पुरस्कार करावा

आज जागतिक महिला दिन. एक दिवस समस्त महिला वर्गाचा गौरव करण्याचा दिवस. या दिवशी अनेक कार्यक्रमांची रेलचेल असते. सन्मान, पुरस्कारांनी काही महिलांचा गौरवही होतो. खरं तर ती ३६५ दिवस कुटुंबांसाठी राबत असते. तरीही देशाच्या ७५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीत सर्वच क्षेत्रात महिला वर्गांनी उत्तुंग भरारी मारल्याचे दिसून येत आहे. देशाच्या सीमेवर शत्रूशी लढणारी महिला आज डोळ्यांत तेल घालून तैनात आहे. ज्या क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी आहे असे म्हटले जायचे, तिथे आज स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात वावर दिसतो. घर सांभाळणारी महिला ही जसा कुटुंबाचा आधार असते, तसे आज ती देशाचा आधार झाली आहे. त्यामुळेच देशाचा अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळण्याची जबाबदारी आज एक महिला समर्थपणे सांभाळत आहे. केंद्रीय अर्थमंत्री म्हणून निर्मला सीतारामन या यावर्षीचाही अर्थसंकल्प सादर करतील. समाजाचे नेतृत्व करणाऱ्या राजकारणातही आज मोठ्या प्रमाणात स्त्रीशक्तीची प्रत्येक राजकीय पक्षाला गरज वाटत आहे. महिलांना राजकारणात स्थान मिळावे यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत आरक्षण, महिलांसाठी राखीव जागा ठेवण्याचा पहिला निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला होता. त्याचे पडसाद देशभर उमटताना दिसत आहेत. कुटुंब आणि घर सांभाळून समाजात आपले स्थान निर्माण करणाऱ्या स्त्रियांचा आपण गौरव करतो, त्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करत असतो. तरीही चांद्रापासून बांद्रापर्यंत सर्वच स्त्री वर्गाला तितकाच मानसन्मान मिळतो का? हा संशोधनाचा विषय आहे.

आई, बहीण, मैत्रीण, प्रेयसी, पत्नी अशा प्रत्येक वळणावर स्त्री प्रत्येक पुरुषाच्या जीवनातील महत्त्वाचा दुवा आहे. तिच्याशिवाय घर, कुटुंब ही संकल्पनाही पूर्ण होत नाही. हीच स्त्री आपल्या प्रगल्भ देशात उंच भरारी घेत असताना अचानक कुठल्या तरी बंधनात अडकली जाते हीच एक खटकण्याजोगी वस्तुस्थिती नाकारून चालत नाही. जुन्या जाणत्या समाजातील लोकांना जरी ही बंधने मान्य असली तरी आज काळाची गरज म्हणून बघण्याचा दृष्टिकोन बदलला गेला पाहिजे. सामाजिक भान जर व्यवस्थित जोपासले गेले तर मुले असो किंवा मुर्लीना कोणतीही बंधने कधीच आपल्याभोवती आहेत याची जाणीव होणार नाही. या बदलत्या मानसिकतेचा आपल्या देशासाठी चांगला परिणाम दिसून येऊ शकतो. जर आपले हित योग्य दिशेने पाऊले टाकणारी असतील तर देशही बदलण्यास वेळ लागणार नाही. आधुनिकतेची जोड दिल्यास विचार योग्य दिशेने नक्कीच बदल घडवू शकतात. आभाळाला त्याच्या भव्यतेचे बंधन नसेल तर मग स्त्रीयांनाच का? याचा आता विचार करण्याची वेळ आली आहे. तर मग नुसते "महिला दिन' साजरा करून उपयोग काय!, असा प्रश्न उपस्थित होतो.

स्त्रियांना त्यांच्या विचारानुसार वागण्याची मुभा द्यायला हरकत नाही, याचा समाजाने विचार करायला हवा. कारण एका महिलेला पालकांकडून, समाजाकडून मिळालेला पाठिंबा आणि स्वातंत्र्य तिला तिच्या ध्येयाकडे अगदी बिनधास्तपणे नेऊ शकते. आज कायद्याने स्त्रियांना झुकते माप दिल्याने "ती' स्वेच्छेने स्वतःचे निर्णय घेण्यास समर्थ आहे. पण स्त्रिला स्वतःच्या मनाप्रमाणे खरंच जगता येतेय का? हा मोठा प्रश्न आहे. कारण तिने कुठे जावे? कोणाशी बोलावे? एवढेच काय तर तिने कोणते करिअर निवडावे? हे सर्व तिच्या संबंधित असलेले निर्णय घेताना तिच्या मनाचा विचार करण्याआधी तिचे आई-बाबा हे समाजाचा विचार आधी करतात. आजच्या स्त्री-पुरुष समानतेच्या युगातसुद्धा मुलीवर होणाऱ्या अत्याचाराला तिलाच जबाबदार मानले जाते. मुळात तिने समाजाला स्वतःवर वर्चस्व गाजवण्याची संधी दिली म्हणून तिच्या वागण्या-बोलण्यावर, पेहरावावर बंधने आली. त्यामुळे स्त्रीने स्वतःच स्वतःवर होणाऱ्या अन्यायाला विरोध करायला पाहिजे. आजही देशाच्या काही भागांत मुर्लीना मुलापेक्षा कमी दर्जा दिला जातो. आजही मुर्लीना स्वतःच्या आवडीचे करिअरच निवडता येत नाही. त्यांच्या इच्छा-आकांक्षांना काडीमात्र किंमत नाही. मला असे वाटते की, अशा पालकांना आपण शिक्षणाचे तसेच मुर्लीच्या कर्तृत्वाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. आपण एक उदाहरण म्हणून पाहूया. एक मुलगा जेव्हा शिक्षित होतो, त्यावेळी देशाचा एक नागरिक म्हणून त्याचे कर्तृत्व हे स्वकेंद्रित असू शकते; परंतु एक स्त्री जेव्हा उच्चशिक्षित होते, त्यावेळी त्याच्या सोबतच्या कुटुंबाला ती प्रगतिपथावर नेण्याचा प्रयत्न करत असते. तिची धडपड निसर्गतः दिसून येते.

आजच्या मुर्लीमध्ये आत्मविश्वासाने वावरण्याची, योग्य तिथं खंबीर होण्याची, नाठाळाच्या माथी काठी हाणण्याची, आपली स्वप्न साकार करण्याची उमेद आहे, जिद्द आहे. पण बऱ्याचदा आजूबाजूचे वातावरण त्यांना सतत कमकुवत करत असते. कितीही मोठ्या कंपनीत नोकरीला असली तरी किंवा कितीही ङ्गसभ्यफ पोशाख केला असला तरी अत्याचार झाल्याच्या घटना घडल्या आहेत. आज मुली अनेक वेगवेगळ्या क्षेत्रात नाव कमावताना दिसतात. पण त्यांची संख्या असते ती अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी. त्यामुळे स्वातंत्र्य कुठे आहे? असे वाटणे स्वाभाविक आहे. पालकांनी मुर्लीवर विश्वास ठेवून एकदा तरी पाहिला पाहिजे. त्याच्या आवडीच्या क्षेत्रात त्यांना करिअर करू दिले पाहिजे. त्या खूप पुढे जाऊ शकतात. त्याचबरोबर त्या घर आणि काम उत्तमरीत्या सांभाळतील, हे नव्याने सांगायला नको. असे असले तरी समाजात स्त्रीला नेहमीच दुय्यम वागणूक दिली जाते आणि तिला अबला समजले जाते, ही एक प्रवृत्ती आहे. या उलट स्त्रियांनी सगळ्याच क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. त्यामुळे स्त्री ही सबलाच आहे, हे समाज मनावर बिंबवायला हवे. आजच्या काळाची स्त्री ही चूल, मूल सांभाळून घरची आर्थिक स्थिती सांभाळण्यासाठी उभी राहताना दिसते. आता फक्त तिला अपेक्षा असते ती पाठिंब्याची.

नळ योजना बंद असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी वणवण

सडक अर्जुनी: तालुक्यातील तिडका येथील पाणीपुरवठा योजना बंद पडली असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. केंद्र शासनाचे घर घर नळ योजनेंतर्गत नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी घर नळ योजना सुरू करण्यात आली. मात्र, तिडका ग्रामवासी शुद्ध पिण्याचे पाण्यापासून वंचित आहेत.

तिडका येथील पाणीपुरवठा योजना बंद असून, पिण्याचे पाण्यासाठी नागरिकांना विशेष करून महिलांना बोअरवेलवर पाण्यासाठी भांडणे करावे लागत आहे. या गावापासून पंचायत समिती सडक अर्जुनी हाकेच्या अंतरावर असून मागील तीन-चार वर्षापासून येथील नळ योजना बंद पडली असल्याने दुषित पाणी घ्यावे लागत आहे. या गावची लोकसंख्या दोन हजार असून, ग्रामपंचायतमध्ये तीन वॉर्ड आहेत. सदस्यसंख्या ९ आहे. तिडका येथे सन१९९०मध्ये पाणी पुरवठा योजनांतर्गत नळाद्वारे पाणी पुरवठा होत असे. पण, सन २०१९ मध्ये पाणी पुरवठा योजनेच्या पाणी टाकीचे साहित्य जिर्ण झाल्याने पाणी पुरवठा बंद पडले आहे. सन २०२० मध्ये ग्रामपंचायतने जि. प. शाळेसमोर बोअरवेल खोदून त्यावर पंप बसविले. जुन्या घरगुती पाईप लाईनला जोडणी करून गावातील पाणी पुरवठा सुरू केले. पण या पंपाने वार्ड क्रं. १ मधील ४०० लोकांना पाणी पुरवठा होत आहे. वार्ड क्रं. २ व ३ मधील १५०० लोकांना बोअरवेलच्या पाण्यावर अवलंबून आहेत. यात माळी, ढिवर, आदिवासी, हलबी या जातीचे लोकांना पंपाचे दुषित पाण्याचा वापर करावा लागत आहे. एकिकडे केंद्र व राज्य शासन स्वच्छ गाव व स्वच्छ पाणी घर तेथे नळ ही योजना सन २०१७ पासून राबवित असून ही योजना लोकप्रतिनिधी यांचे भाषणापुरतीच राहिलेली दिसते. तसेच जि.प.व पं.स.येथील अधिका?यांच्या निष्क्रियतेमुळे ६० ते ७० टक्के गावांना पिण्याचे पाण्याच्या समस्येशी झुंजावे लागते. वरिष्ठ अधिकारी गावोगावी शुद्ध पाणी पुरवठा पुरवित असल्याचे सांगून स्वतःची पाठ स्वतःच थोपटत असल्याचे दिसून येते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

ज्ञानेश्वर उर्फ दादाजी महाराज (हिंमतपूर वातोडा)



सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

दीनबंधू दीनमित्र अशी नावे सत्यशोधक चळवळीत सातत्याने येतात. या पत्रांच्या कर्त्यांच्या नावाशिवाय चळवळीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. दीनांच्या उद्धाराकरिता महामानवांनी शोषकांच्या विरुद्ध लढा दिला. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वतः हालअपेष्टा सहन केल्या. मग ते कोणत्याही माध्यमातून जाणाऱ्या व पुर्वीच्या थुगाव या नावाने परिचित असलेल्या गावापासून पाच किलोमीटर अंतरावर असलेले पुर्वीच्या अमरावती तालुक्यातील पूर्णा नदीच्या काठावर वसलेले आज भातकुली तालुक्यात समाविष्ट असलेले आडवळणाचे गाव हिंमतपूर वातोंडा नदीच्या एका तीरावर तर दुसऱ्या तीरावर सावळापूर, पूर्णा नदीच्या काठावर हा नित्याचा भाग असे. मध्यंतरी चार-पाच वर्षापुर्वी आमचे स्नेही नमनराव देशमुख यांच्याकडून दादाजी महाराज यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाची निमंत्रण भोळ्याभाबड्या जनांतील अनिष्ट, निरर्थक, भ्रामक चालीरिती न पाळणे, जातिभेद मोडण्यासाठी अन्नकाला करणे इत्यादी कृतीकार्यक्रम गणपती महाराज करीत असत. त्याचे जोरदार समर्थन ज्ञानेश्वर महाराज करीत असत. परंतु अशा काही कृतीचा अवलंब केला म्हणून त्यांचा समाजघातकी, दुष्ट लोकांच्या नादी लागून अज्ञानी लोकांकडून अत्यंत छळ सुरु केला. इतकेच नव्हे तर प्राणांतक पाळ्याही सहन करावय लागल्या. ज्ञानेश्वर महाराज आपत्तींना न जुमानता स्वतः संतव्रताचा पाळत असत. इतरांना आपल्या सहज बोलण्यातून कीर्तनातून सतत सत्याचा उपदेश करीत.

होणारे शोषण असो. त्या-त्या काळात अशा महामानवांचा इतिहास आपण ज्ञात करुन घेत असतो. त्यास उजाळा देत असतो. काही आपणास ज्ञात असतात, तर काही अज्ञात, मला स्वतःला वरील दोन नावे सत्यशोधक चळवळीमुळे परिचित होती. परंतु दीनस्थान हे नाव माझ्याशी लहानपणापासूनच जुळलेले होते. अमरावती जिल्ह्यातील परतावाडा-अमरावती हा मुख्य रस्त्यावरुन जवळच लागून असलेल्या आज पूर्णानगर या नावाने ओळखल्या असणाऱ्या गावांना पूर्णा नदीचे नाव चिकटलेले येथून जवळच असलेल्या पंधरा एक कि.मी. अंतरावर माझे गाव राजना (पूर्णा) दीनस्थान हे हिमंतपूर वातोंडयाला लागूनच असलेले. ज्ञानेश्वर उर्फ दादाजी महाराज यांचे निवासस्थान आहे. लहानपणी मी माफ्या आजीसोबत अनसुयाबाई जात असे. ते तिचे माहेर, शामरावजी रावजी गवळशी पाटलांची ती मुलगी. या गावी दर उन्हाळ्यात माझे जाणे असायचे. तेव्हा दीनस्थानला आम्ही जात होतो. त्या वेळी फारसे कळायचे नाही. परंतु तेथे जाणे, खेळणे, पत्रिका मिळाली. त्या पत्रिकेत माझे जेष्ठ सत्यशोधक मित्र डॉ. अशोक चोपडे, वर्ध यांचे प्रमुख वक्ते म्हणून सत्यशोधक श्रीपार दीनदेव तपोनिधी ज्ञानेश्वर उर्फ दादाजी महाराज नाव पाहिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उमाळे साहेब सेवानिवृत्त न्यायाधीश, आमचा डॉ. दीपालीताई गवळी, माजी महापौर, अमरावती. अशा नातेमंडळीची सुद्धा नावे पाहून सत्यशोधकांचा आणि या स्थळाचा काय संबंध? हा प्रश्न मला पडला. आणि मग सुरु झाला शोध. या संदर्भात अधिक माहिती माझ्या वडिलांचे चुलतमामा दिनकरराव गवळी यांच्यामार्फत कळाली. त्यांचे वडील हरिभाऊ गवळी व माफ्या आजीचे वडील शामरावजी गवळी या दोघांनाही दादाजी महाराजांचे श्वेत स्वतंत्र निशान स्विकारले होते. अशी माहिती दादाजीचे लेखनिक नरहरी येडे यांनी सांगितले. असे स्वानुभव कहाणीत महाराजांनी नमूद केले आहे. हेही नरहरी येडे यांनी सांगितले.

दादाजी महाराज याचा जन्म इ.स.१९०९ मध्ये फाल्गून वद्य ५ ला अमरावती जिल्ह्यातील धामणगाव (रेल्वे) या गावापासून पंधरा-वीस किलोमीटर अंतरावर असलेल्या पुर्वीच्या चांदूर (रेल्वे) तालुक्यातील मंगरुळ दस्तगीर येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव गणपती उर्फ हरी महाराज आणि त्यांच्या आईचे नाव मनाबाई दादाजींचे मूळ नाव ज्ञानेश्वर, त्यांची बहीण मुक्ताबाई, त्यांच्या जन्माच्या बाराव्या दिवशी संत भालचंद्रनाथ हे मंगरूळ दस्तगीर येथे गणपती महाराजांच्या घरी येऊन किर्तन करुन त्यांनीच त्यांचे नाव ज्ञानेश्वर ठेवले. (खं.मूळ सत्यार्थ बोथ, अत्यल्प जीवन चरित्र, ले.नरहरी येडे पृ.१७) त्यांचे वडील गणपती महाराज म्हणजे जात-पात न माननारे, अजातचे प्रणेते होते. आज ॲड. प्रकाश आंबेडकर शाळेच्या दाखल्यावर जातीचा उल्लेख करु नये, म्हणून मागणी करताहेत, परंतु अशी प्रत्यक्ष अंमलबजावणी गणपती महाराजांनी स्वतः व त्यांच्या शिष्यगणांनी केली होती. त्यांची किर्ती फार दूर पसरली होती. अंधश्रद्धा निर्मूलन, आंतरजातील विवाह, शिक्षण प्रसार, अस्पृश्यांना मंदिरप्रवेश, अन्नकाला अशा अनेक कार्याचे ते पुरस्कर्ते होते. मिश्र विवाहाला त्यांनी पाठिंबा दिला होता. त्याप्रमाणे कृतीसुद्धा केली होती. मंगरुळ दस्तगीर येथे दि.११ नोव्हेंबर १९२९ ला स्वतः च्या मालकीचे विठ्ठल मंदिर सर्व स्पृश्य-अस्पृश्यांना कलकत्याचे अस्पृश्याचे प्रमुख पुढारी विराटचंद्र मंडल, बी.ए. यांचे नेतृत्वास खुले करुन दिले होते. यावेळी त्यांना सत्यशोधक हरीचा जलसाकार गुलाबराव पाटील नायगावकर यांनी मदत केली होती.

अशा गणपती महाराजांनी आरंभी संत नेम शिस्तीला अनुसरुन कडक वर्तणूक केली. त्यांच्या पत्नी मनाबाई सर्व शिष्यगणांना अत्यंत प्रिय होत्या. सर्वजण तिला माय म्हणून हाका मारीत असत. तेच प्रेम मनामायाने आपल्या सुपुत्रास पाजले. गावोगावी फिरुन भजन-किर्तन करणे गणपती महाराजांचे चालूच असे. इ.स.१९२१-२२ सालापर्यंत अंदाजे ६-७ वर्षांच्या कालावधीत गणपती महाराजांनी यवतमाळ जिल्ह्यातील मादनी, विरूळ तसेच अमरावती जिल्ह्यातील कावली (वसाड) या गावी वास्तव्य केले. अशा स्थळपालट परिस्थितीमध्येच ज्ञानेश्वर महाराज यांचे शिक्षण झाले. लवकरच मनाआईची प्रकृती बिघडली. कासारखेड (हिंगणगाव) येथील मनाआईचे अत्यंत जिव्हाळ्याचे गृहस्थ पांडुरंगजी ठावरे व त्यांची पत्नी भीमाबाई ठावरे हे गणपती महाराजांचे घरी आले असता, गणपती महाराजांच्या परवागीने मनाबाई, बाळ ज्ञानेश्वर व मुक्ताबाई भीमाबाईसोबत कासारखेड येथे औषधी घेण्याकरिता आली आणि तिथेच तिने आपला पार्थिव देह ठेवला. बाळ ज्ञानेश्वर व मुक्ताबाई पोरकी झालीत. ज्ञानेश्वराची तल्लख बुद्धी आणि संतशिस्तीच्या नीतीनियमांनी बाळ ज्ञानेश्वर वागत असल्यामुळे गणपती, महाराजांच्या शिष्यगणांकडून त्यांच्या ज्ञानेश्वर नावाच्या आधी तपोविधी हे विशेषण जोडल्या गेले. कोणी-कोणी त्यांना दादा अथवा दादाजी याही नावाने हाकारीत असत. (सं.मुळ सत्यार्थ बोध, पृ.१९)

भोळ्याभाबळ्या जनातील अनिष्ट, निरर्थक, भ्रामक चालीरिती न पाळणे, जातीभेद मोडण्यासाठी अन्नकाला करणे इत्यादी कृतीकार्यक्रम गणपती महाराज करीत असत. त्याचे जोरदार समर्थन ज्ञानेश्वर महाराज करीत असत. परंतु अशा काही कृतीचा अवलंब केला म्हणून त्यांचा समाजघातकी, दृष्ट लोकांच्या नादी लागून अज्ञानी लोकांकडून अत्यंत छळ सुरु केला. इतकेच नव्हे तर प्राणांतक सहन कराव्या लागल्या. ज्ञानेश्वर महाराज आपत्तींना न जुमानता स्वतः संतव्रताचा पाळत असत. इतरांना आपल्या सहज बोलण्यातून, किर्तनातून सतत सत्याचा उपदेश करीत. सत्याचा उपदेश करताना त्यांच्या ठिकाणी भीड, भीती, शंका या गोष्टीची रतीमात्रही विचार नव्हता. धन्य ते सदुरु सत्य सांगे ज्ञान. जावो राहो प्राण तुका म्हणे. महाराजांच्या किर्तनामध्ये श्रोते तल्लीन होऊन जात. सामान्यांची दिशाभूल करणाणे भेदी, समाजघातकी यांना थरकाप सुटल्याखेरीज राहायचा नाही. असत्य, पाखंड, दुराचाराचे खंडन ते सत्याच्या जोमाने फार आवेशातून करीत असत. (संदर्भ-मुळसत्यार्थबोध, पृ.१९, लेख-लेखक नरहरी येंडे).

गणपती महाराजांच्या शिष्यमंडळीत लोणसावळी येथील विठाबाई धुरट नावाची विधाबवाई होती. गणपती महाराजांनी तिला विचारुन तिची मुलगी विठाबाई ही कुणबी जातीची व आपली जात माळी विठाबाईच्या मुलीशी मी तुझा विवाह ठरविला. तुला कबूल आहे काय? यावर ज्ञानेश्वर महाराज म्हणाले, जात-पात भेद मला दिसत नाही. मानव एक जात आहे. परंतु विठाबाईच्या नातेवाईकांनी विरोध केला. गणपती महाराजांच्या घराभोवती लोक लाठ्याकाठ्या घेऊन उभे राहिले. झगडा करण्याचा त्यांचा तो रंग पाहून त्या दिवशी लग्न स्थगित करुन गणपती महाराजांनी वर्धेला नायडू वकिलांना ही हकीकत सांगितली. त्यांनी या मिश्रविवाहास पाठिंबा दिला. बॅरिस्टर, वकील, पोलीस इन्स्पेक्टर, पोलीस व इतर प्रेमी या सर्वांच्या उपस्थितीत ज्ञानेश्वर महाराज आणि सुलोचनाबाई यांचा विवाह वर्धेला रावबहादूर नायडू वकील यांच्या येथे संपन्न झाला. ही एक क्रांतीच गणपती महाराजांनी केली. त्यास ज्ञानेश्वर महाराजांनी साथ दिली.

ज्ञानेश्वर महाराजांनी त्याच काळात स्वतंत्र लेखन सुरु केले. अनेक ग्रंथांचे वाचन, ममन किंवा विचार ऐकूनण त्यावरुन त्यांनी रचना केली नाही तर जे जे स्वतःच्या अनुभवास आले. ते त्यांनी स्वानुभावाने लिहिले. पुढे त्यास त्यांनी स्वानुभवे कहाणी म्हणाले इयत्ता तिसरा वर्ग पास असणारे वर-वर अशिक्षीतीप्रमाणे वाटत असले तरी, त्यांच्या विपुल साहित्यनिर्मीतीवरुन त्यांची वेदशास्त्रवेत्यांनासुद्धा लाजवणारी स्वानुभवी अर्थपूर्ण लेखन-रचना दिसतात. दरम्यान त्यांच्या पहिल्या पत्नीचे निधन झाल्यावर नागपूर जिल्ह्यातील भिवापूर येथील खंडोबा लोहकरे यांची सुपुत्री तुळसाबाई हिचेशी द्वितीय विवाह १९३४ साली गणपती महाराजांच्या आज्ञेवरुन झाला.

मंगरूळ दस्तगीर येथे लहान मुलांना व्याहारीक ज्ञानाबरोबरच सत्यधर्म नीतीची, मानवतेचे सुशिक्षण मिळावे ते सुसंस्कारीत व्हावे म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी धर्म-निती शिक्षण या नावाखाली शाळा चालविली. अशा प्रकारे त्यांचे कार्य जोमात चालू होते. समाजसुधारणेसाठी गणपती महाराजांनी राबविलेले कार्य ज्ञानेश्वर महाराज पुत्र म्हणून नव्हे तर शिष्य म्हणून करीत होते. आणि त्यात त्यांची प्रसिद्धीही होत होती. हे काही जणांना पटत नव्हते. विरोधकांबरोबर स्वकीयांमध्ये सुद्धा असूया निर्माण होत होती. यातच मुर्तीपूजा बंद म्हणून गणपती महाराजांनी मंगरूळातील विठ्ठलरुक्मिणीच्या आपल्या मंदिराला कुलूप लावले. तेव्हा विरोधकांनी तर कहर करुन सोडला. गणपती महाराज आणि ज्ञानेश्वर महाराज यांना होळीत जिवंत टाकून जाळण्याचा कट रचण्यात आला. एकदा गावामधून वारी (दिंडी) निघाली असता दृष्टबुद्धीच्या लोकांनी ज्ञानेश्वर महाराजांसह वारीतील लोकांवर विष्ठा, शेण, माती व अपशब्दांचा वर्षावर केला. जबरदस्तीने ज्ञानेश्वर महाराजांना गाढवावर बसवून खेटरे व हाडकांची माळ त्यांच्या गळ्यात घालून द्यावी, असाही अयशस्वी प्रयत्न केल्या गेला. ज्ञानेश्वर महाराजांची वर्तणूक अतिशय नम्रतेची दीनपणाची होती. म्हणून त्यांना पुढे लोक दीनदेव म्हणून ओळखू लागले. तरी त्यांच्याविरुद्ध कटकास्थान करुन प्रेम अभिर्भाव दाखवून पुरणपोळीमधून विष घालण्याचाही अमानुष प्रयत्न केल्या गेला. त्यांच्यापुढे आपत्तीचा डोंगर उभा राहिला. पुढे गणपती महाराजांशी तात्विक मतभेद झाल्यामुळे त्यांना तेथे राहणे कठिण गेले आणि ज्ञानेश्वर महाराजांनी मंगरुळ दस्तगीर येथील आपले वास्तव्य सोडले. (संदर्भ वरीलप्रमाणे, पृ.२३).

१९४० साली ११ मे रोजी रखरखत्या उन्हात ज्ञानेश्वर महाराज मंगरूळ सोडून निघाले. प्रथम ते मादनी या गावी आले. भर उन्हात पोटात काहीही नाही. अशा परिस्थितीत ते भटकत होते. पुन्हा तेथे राहण्याविषयी त्यांचा बेत बदलला आणि ते हिंमतपूर वातोंडा या गावी येऊन, हिंमतपूर वातोंडा आणि सावळापूर या दोन गावांच्या मध्यभागातून वाहणाऱ्या पूर्णा नदीच्या तीरी गर्द अशा चिंचांच्या वृक्षराजीत सावळापुरचे गोविंदराव पाटील यांच्या शेतात त्यांनी आपली झोपडी बांधली. त्यांच्यासोबत बरीचशी शिष्यमंडळी आली होती. ती पुन्हा परत गेली. या शेतात काही दिवस राहिल्यांतर ते कुष्टा येथील झिंगुजी खरड यांच्या घरी राहिले. परंतु पुन्हा ते हिंमतपूर-वातोंडा येथे परत आले. त्यांना महादेवराव इंगळे यांनी अर्पण केलेल्या शेतातील जागेत झोपडी बांधून राहुटी ठोकली. येथे येण्याचे प्रयोजनही होते. कारण हिंमतपूर वातोंडा येथे गणपती महाराजांची शिष्यमंडळी होती. वातोंडा व सावळापुरच्या पूर्णा नदीच्या तिरावर १९२४ साली मे महिन्यात गणपती महाराजांनी चार गावाच्या शिदोऱ्या बोलावून आंब्याच्या अंबराईत काला करुन एकमेकांना आनंदाने वाटून येथे त्यांनी प्रबोधन केले होते. त्यांचे वर्णन सहजसद्धिानुभव या ग्रंथात वातोंड्याचा काला म्हणून गणपती महाराजांनी केले आहे. या गावाशी पुर्वीच ऋणानुबंध असल्यामुळे, ज्ञानेश्वर महाराज येथे आले. त्यांनी त्या स्थानास दीनस्थान हे नाव देऊन येथेच स्थायिक झाले. तेथे त्यांनी श्वेतनिशाण उभारले, त्या निशाणावर सतीत्व मुळ स्थितीदर्शक स्वतंत्र दिशाण दीनस्थान हा शिक्का दिला. श्वेतनिशाण (स्वतंत्र), श्वेतवस्त्र, श्वेतगंध, मुळ शुद्ध स्वरूपदर्शक प्रतीक ठरविले. त्यांच्या अभंगात महात्मा जोतीराव फुलेंप्रमाणे ते म्हणतात- नाना धर्म पंथ आहेत लोकांत, खुणी आहेत न्याऱ्या-न्याऱ्या आपापुल्या मतापरी अर्थ कोणीही दावितात करुनिया. त्यांनी चमत्कारावर कडाडून टिका केली. सत्यशोधनाचे कार्य केले. सत्य शुद्ध ज्ञान-अनुभव या आधारावर त्यांनी अभंग रचना केली. विविध विषयांवर आपले मते स्वानुभव कहाणी या अनुभवपर कहाणीत मांडले आहेत. सत्यत्वाच मुळ शोधण्याकरिता अनुभव घेऊन, साहित्यनिर्मिती केली. ती पढत-पंडितांची नव्हती तर सत्यशोधकाची कृतीशील होती. अज्ञानामुळे नाना वर्ण जाती, देव निर्माण झाले. या सर्वांचे मुळ म. फुले म्हणतात, त्याप्रमाणे त्यांनीही अज्ञान म्हटले. अज्ञानामुळे काय होते हे ते एका अभंगात मांडतात ये येणेप्रमाणे- अज्ञानामुळेच असे मुर्तीपूजा, मुळ आत्मजेजा न जाणता, आपुलियावरी प्रेम आपुलाच. अज्ञानामुळेच असे मुर्तीपूजा मूळ आत्मजेजा न जणता, आपुलियावरी प्रेम आपुलाच. अज्ञानामुळेच नाही खरा! लोपले अज्ञाने मूळ सत्य ज्ञान, आपली भूल न ज्ञान्य म्हणे! (संदर्भ- ज्ञानगीता व नामदेव पाठ, रचियता दादाजी महाराज पृ.८) असे मते त्यांनी मांडली. शुद्र-ब्राम्हण संवाद हाही एक विचारप्रवर्तक असा संवाद त्यांनी मांडला आहे. तो मुळातूनच वाचला पाहिजे. (संदर्भ- दादाजी महाराज रचित भजनावली, प्रकाशक निलीमा काळे, पृ.३००)

दीनस्थानवर त्यांनी गावकऱ्यांकरिता त्यांच्या प्रबोधनासाठी आगळेवेगळे कार्यक्रम योजून जातिभेद मोडून काढला. उच्चनीचता, स्त्री-पुरुष विषमता भेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आपवर्षावर कार्यक्रम लोटांगणाचा कार्यक्रम, पाय धुण्याचा कार्यक्रम, अज्ञान-निर्मूलन-ज्ञानप्रबोधात्मक भारूड, भजने, पति-पत्नीचे साष्टांग नमस्कार करण्याचा जगावेगळा कार्यक्रम, पत्नी श्रेष्ठत्वाचा अर्थात स्त्रीसन्मानाचा हा कार्यक्रम या ठिकाणी संपन्न होतात. आज हे विशेष वाटत नसते तरी हे क्रांतीकारी आहे. यात शंका नाही. एका लेखात त्यांचे कार्य-लिखाण यांचा आढावा घेणे शक्य नाही. ते करणे म्हणजे त्यांच्या कार्याला वाकुल्या दाखविण्यासारखे होईल. सत्य आचरणाचा आदर्श, सावता माळी यांच्याप्रमाणे पंढरपूरला न जाता, कांदा मुळा भाजी! अवधी पंढरी माझी असे म्हणणाऱ्या व घामावर विश्वास ठेवणाऱ्यासारखा होता. मंगळवार १३ जानेवारी १९७६ रोजी त्यांचे देहावसान झाले.

चिंचवड कसबा पोटनिवडणुकीचा अन्वयार्थ

महाराष्ट्रात काही दिवसाआधी पाच विधान परिषदेच्या निवडणुका झाल्या. या पाच जागे पैकी तीन जागा मविआ(महाराष्ट्र विकास आघाडी) व एक जागा भाजपाला मिळाली.. एका ठिकाणी अपक्ष उमेदवार निवडून आला. विशेष म्हणजे विदर्भात फाडनवीस गडकरी सारखे उत्तुंग नेतृत्व भाजपाकडे आहे त्या विदर्भातील दोनही जागा मविआस मिळाल्या. नागपूरची निवडणूक शिक्षक मतदार संघाची होती. येथे तिरंगी निवडणूकचे चित्र असतानाही मविआ उमेदवारांनी भाजपाच्या उमेदवाराला दुप्पट च्या मताने पाडले. अमरावती निवडणुकीत पदवीधरांना मतदान करायचे होते; पदवीधरांनी सुद्धा भाजपाच्या विरुद्ध ही जागा महाविकास आघाडीला दिली.

शिक्षक झाले; पदवीधर झाले आणि आता सामान्य जनता. भाजपाच्या दोन आमदारांच्या मृत्यूमुळे रिक्त झालेल्या जागांची पोटनिवडणूक नुकतीच झाली. दोन्ही जागा पुणे विभागातल्या कसबा आणि चिंचवड. संपूर्ण महाराष्ट्राच लक्ष या निवडणुकीवर लागले होते. लक्ष यासाठी सुद्धा होते की या दोन निवडणुका २०२४ ला होणाऱ्या लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीची मार्ग निर्माण करणाऱ्या होत्या.

कसब्याला मृत पावलेल्या आमदार मुक्ता टिळक. कसबा हा ब्राह्मण बहूल विभाग. २८ वर्षापासून भाजपाचा आमदार येथून सातत्याने निवडून येत होता. पुणे खासदार बापट आधी याच मतदारसंघातून निवडून आलेले. भाजपाने निवडणुकीत ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद टाळण्यासाठी मराठा समाजातील व्यक्तीला उमेदवारी दिली. कुठल्याही परिस्थितीत निवडणूक जिंकण्यासाठी सर्व काही सोडून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री दोन-तीन दिवस प्रचारात होते. रोड शो करत होते. ब्राह्मणांना तिकीट न दिल्यामुळे हिंदू महासभेचे अध्यक्ष दवे यांनी रागातून उमेदवारी जाहीर केली. ब्राह्मणांची मतं कमीत कमी आपल्याला मिळतील असे त्यांना वाटले होते व त्यामुळे ही निवडणूक तिरंगी होईल असा त्यांचा कयास होता. निवडणूक दुरंगी झाली आणि दवे यांना मात्र काही शेकडा मते मिळाली. काँग्रेसचा उमेदवार दहा हजार पेक्षा जास्त मतांनी निवडून आले. भाजपाचा बालेकिल्ला ढासळला.

इकडे चिंचवड मध्ये मविआतील पक्ष रष्ट्रवादी व शिवसेनेमध्ये उमेदवारीसाठी वाद होता. येथील उमेदवारी शिवसेनेस दिल्यास बहुजन वंचित आघाडी समर्थन देईल असे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले. कारण वंचित आघाडीने उद्धव ठाकरे यां

राजकुमार बडोले आज पर्यंतचे सर्वोत्तम समाज कल्याण मंत्री:बावनकुळे

गोंदिया : भारतीय जनता पक्ष अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राच्या वतीने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. ४ मार्चला शक्तीकेंद्र स्तरीय भव्य कबड्डी स्पर्धा, धन्यवाद मोदीजी कार्ड संकलन, चित्रकला स्पर्धा पुरस्कार वितरण, जाहीर पक्षप्र-वेश व कार्यकर्ता मेळावा पार पडला दरम्यान आपल्या भाषणात भाजप प्रदेश अध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप ने केलेल्या कामांचा पाढा वाचला तसेच विरोधकांवर देखील टीका केली.

कार्यक्रमात काँग्रेस, राष्ट्रवादी, आप पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा भाजप प्रवेश घेत नाना पटोले यांच्यावर टीका केली. काँग्रेसचे कार्याध्यक्ष रत्नदीप दहिवले, सरपंच अनुराधाताई बन्सोड, सरपंच पंचशीलाताई मेश्राम, सरपंच महेश गहाणे, सरपंच चेतनाताई पटले, माजी पंचायत समिती सदस्य कमलेश वासनिक, सुदाम कोवे यांनी त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश केला. चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रवेश करणाऱ्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे स्वागत करत आपल्या विश्वासाला कधीही तडा जाणार नाही असे आश्वासन दिले.

राजकुमार बडोले यांच्या सारखा सामान्य घरातून आलेला कार्यकर्ता आमदार झाला, मंत्री झाला. रखडलेले ४० वर्षापासुनचे प्रश्न बडोले यांनी सोडविले. मला त्यांच्या बद्दल अभिमानाने सांगावेसे वाटते कि ते सर्वत्तोम समाज कल्याण मंत्री होते. सोबतच माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी ज्या ज्या मागण्या सरकार के केलेल्या आहेत त्या सर्व मागण्या मी स्वतः राज्याचे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्या कडे घेऊन जाणार आहे. त्यामुळे कसलीही काळजी करण्याची गरज नाही. असे आश्वासन देखील चंदशेखर बावनकुळे यांनी दिले. प्रत्येक बूथ वरुन ३ मते अधिक मिळाली असती तर आज बडोलेजी परत समाज कल्याण मंत्री असते. राजकुमार बडोले माजी झाले यात बडोले यांचे नुकसान झाले नाही. यात नुकसान जनतेचे झाले. इंदू मिलचा प्रश्न असेल किंवा दिक्षा भूमीला १०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचा तसेच भारतातील तरुणांना विदेशात प्रेरणा मिळावी म्हणून बडोलेजी यांनी केंद्र सरकार सोबत मिळून पाठपुरावा करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील घर राज्य सरकार तर्फे खरेदी केले आणि अशा कार्यासक्षम नेत्याला आमदार होता आले नाही यात विधानसभा क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे. म्हणून आपण सर्वांनी राजकुमार बडोले यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे.

भारतीय जनता पक्ष अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राच्या वतीने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. ४ मार्च २०२३ ला शक्तीकेंद्र स्तरीय भव्य कबड्डी स्पर्धा, धन्यवाद मोदीजी कार्ड संकलन, चित्रकला स्पर्धा पुरस्कार वितरण, जाहीर पक्षप्रवेश व कार्यकर्ता मेळावा पार पडला दरम्यान कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सर्वश्री केशवराव मानकर अध्यक्ष भाजप गोंदिया जिल्हा, गोंदिया भंडारा लोकसभा क्षेत्राचे खासदार सुनील मेंढे, माजी पालकमंत्री परिणय फुके, भाजप विदर्भ प्रदेश संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर, विजय रहांगडाले आमदार तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्र, भाजप प्रदेश उपाध्यक्ष हेमंत पटले, पंकज रहांगडाले अध्यक्ष जिल्हा परिषद गोंदिया, विरेंद्र अंजनकर संपर्कप्रमुख गोंदिया भंडारा, गोपालदास अग्रवाल, रमेश कुथे, भेरसिंह नागपुरे, खोमेश रहांगडाले, नेतराम कटरे प्रदेश कार्यकारिणी सदस्य, इंगळे प्रदेश कार्यकारिणी सदस्य, रचना-ताई गहाणे प्रदेश कार्यकारिणी सदस्य,लायकराम भेंडारकर गटनेते जि.प. गोंदिया, संजय टेंभरे सभापती बांधकाम जि.प. गोंदिया,सविता पुराम सभापती, जि.प. गोंदिया, रुपेश कुथे सभापती जि.. गोंदिया, विजय शिवणकर माजी अध्यक्ष जि.प. गोंदिया, लक्ष्मीकांत धानगाये राष्ट्रीय आदि. आघाडी अध्यक्ष, विजयताई कापगते उपाध्यक्ष भाजपा गोंदिया,ग्यानिराम बारसगडे ज्येष्ठ भाजपा नेते,अन्ना पा. डोंगरवार ज्येष्ठ भाजपा नेते, ओम कटरे अध्यक्ष युवा मोर्चा गोंदिया जिल्हा,तिजेश गौतम अध्यक्ष युवा मोर्चा गोंदिया तालुका उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी कार्यकर्ते अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्र यांनी परिश्रम घेतले.

निवडणुक आयोग विकला गेला,तर भाजप संविधानाचा अवमान करतेय-खा.अरविंद सावंत

गोंदिया : महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असतानाच ठाकरे गटाचे नेते, खा. अरविंद सावंत यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहे. निवडणूक आयोग विकला गेला आहे. भाजप-ने संविधानाची हत्या केली असून लोकशाही पायदळी तुडवण्याचे काम त्यांच्याकडून सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयापासून निवडणूक आयोगापर्यंत आणि इतर सर्व यंत्रणा सरकारच्या गुलाम झाल्या आहेत. देशात यापूर्वी असे कधीच घडले नव्हते. निवडणूक आयोगाचे निर्णय मोदी सरकार घेत आहे, अशी टीका अरविंद सावंत यांनी केली आहे. शिवगर्जना यात्रेनिमित्त गोंदियात आले असता ते बोलत होते. सावंत पुढे म्हणाले, "यापूर्वी देखील अनेक राजकीय पक्षात फूट पडल्याचे आपण पाहिले आहे. त्या पक्षाचे चिन्ह गोठवण्यात आले पण दुसऱ्या गटाला देण्यात आले नाही. मात्र, येथे तर २५ लाख प्रतिज्ञापत्र आयोगाला देऊनही चिन्ह आणि नाव दुसऱ्या गटाला देण्याची किमया विकल्या गेलेल्या निवडणुक आयोगाने केली आहे.

गोंदिया जिल्ह्याच्या आमगाव तालुक्यातील ८ गावांनी शेजारील मध्यप्रदेशात विलीनिकरणाची मागणी केली आहे. यावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विदर्भाची फसवणूक करत असल्याचे सिद्ध होते. फडणवीस पाच वर्षे मुख्यमंत्री होते, मात्र त्यांनी आमगाव नगरपरिषदेचे भवितव्य ठरवले नाही. त्यामुळे या ८ गावांची स्थिती अनाथासारखी झाली आहे. हे फडणवीस यांचे अपयश दाखविते, असे सावंत म्हणाले.

नाना पटोले म्हणजे काँग्रेस नाहीत महाविकास आघाडीबाबत आताच सर्व काही ठरणार नाही. मात्र, महाराष्ट्राच्या विकासासाठी एकत्र काम करण्याचे प्रयत्न नक्कीच सुरू राहतील. आघाडीबाबत काँग्रेसचा निर्णय प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेच ठरवतील, असे नाही. सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, बाळासाहेब थोरात आणि पक्षाचे इतर नेते आहेत. त्यांची कोअर कमिटी चर्चेनंतर याबाबतचा निर्णय घेईल. स्वबळाचा निर्णय पटोले यांचा स्वतःचा असू शकतो, पण एकटे नाना पटोले म्हणजे संपूर्ण काँग्रेस नाही, असेही सावंत यांनी स्पष्ट केले. पत्रपरिषदेला विदर्भ संपर्क प्रमुख सुरेश साखरे, निलेश धुमाळ, गोंदिया जिल्हा प्रमुख पंकज यादव, आदी उपस्थित होते.

राऊतांवर हक्कभंग नव्हे तर देशद्रोहाची कारवाई व्हावी-माजी मंत्री बडोले

अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात येत्या होऊ घातलेल्या पक्षाच्या कार्यक्रमाची माहिती देत असतांना माजी पालकमंत्री इंजि.राजकुमार बडोले यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी विधीमंडळाला चोरमंडळ म्हटल्याबद्दल त्यांच्या वक्तव्याच्या निषेध नोंदविला.तसेच सरकारने राऊत यांच्याविरुध्द विधानमंडळात फक्त हक्कभंगाची कारवाई करुन होणार नाही, तर त्यांच्याविरुध्द देशद्रोहाची कारवाई होणे आवश्यक असल्याचे म्हणाले.राऊत यांनी विधीमंडळातील सर्वांना चोर म्हणून संविधानाचा अवमान केला आहे.संविधानाचा अवमान म्हणजे देशद्रोह होय असेही माजी मंत्री बडोले यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

डिझेल पंप चोरटे अडकले पोलिसांच्या जाळ्यात

गोंदिया: तालुक्यातील ओझीटोला येथील शेतशिवारात सिंचनासाठी लावण्यात आलेले डिझेलपंप २७ व २८ फेब्रुवारीच्या रात्री अज्ञात चोरट्याने लंपास केले. या प्रकरणाची नोंद गंगाझरी पोलिसात करण्यात आली. दरम्यान पोलिसांनी शोधचक्र फिरवून चोरट्यांना जाळ्यात अडकविले. अजय साहेबराव पटले (वय २३) रा. केऊटोली व आकाश सूकलाल कुंभरे (वय २१) रा. ओझाटोला असे आरोपींची नावे आहेत.ओझीटोला येथील फिर्यादीच्या शेतात सिंचनासाठी २० हजार रुपये किंमतीचे डिझेल पंप लावण्यात आले होते. २७ व २८ फेब्रुवारीच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी डिझेप पंप चोरून नेले. या घटनेची नोंद गंगाझरी पोलिस ठाण्यात करण्यात आली. ठाणेदार महेश बनसोडे यांनी पोलिसांना आरोपीच्या शोधकामी लावले. दरम्यान गुप्त व तांत्रिक माहितीच्या आधारावर अजय साहेबराव पटले (वय २३) रा. केऊटोली व आकाश सूकलाल कुंभरे (वय २१) रा.ओझाटोला या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

स्त्री आरोग्य आणि आहार...

८ मार्च जागतिक महिला दिन. या निमित्ताने सर्वत्र महिलांचा सन्मान करण्यात येतो. परंतु स्त्रीया आपल्या शरीराचा हवा त्याप्रकारे सन्मान करतात का ? शरीराचा सन्मान म्हणजे फक्त शरीराची वरवरची स्वच्छता नाही तर निसर्गाने आपल्याला दिलेल्या देहाचे योग्यप्रकारे जोपासणूक करणे, काळजी घेणे.

सहज बघितले तर आज आपण आपल्या शरीरात असलेल्या छोट्या मोठ्या विविध व्याधींमध्ये कैद झालेले आहोत आणि याला कारणीभूत आपण स्वतःच आहोत. जरा पूर्वीच्या कालखंडात जाऊन बघुया.. आधीच्या काळातील स्त्रीया सकाळपासून रात्रीपर्यंत सतत काही ना काही कामे करीत असत. जसे विहिरीचे पाणी काढणे, दळण दळणे, कांडणे, पाटावर वाटणे, खाली बसून स्वयंपाक करतांना उठबस करणे, चाळणे, पाखडणे आणि शेतात जाऊन काम करणे. असे अजून खुप काही विविध कामे करायचे ज्यातून त्यांचा सहज व्यायाम व्हायचा आणि खाण्यासाठी दूध, दही, लाडू, करंजी, भाकरी असे विविध पौष्टिक पक्वान असायचे. त्यामुळे सर्व कामातून होणारा व्यायाम व विविध पौष्टिक पदार्थ यामुळे ते उच्चतम व दिर्घायु रोगमुक्त जीवन जगत असत. परंतू आज आपण सर्व फास्ट हवे म्हणून संपूर्ण कामे मशीनींकडून करत चाललो आणि दिवसेंदिवस मशीनी ऋद्धअढ आणि आपण मात्र ऋद्धअढ होत चाललो आणि वाढलेले वजन रोगांना दिलेले यथेच्छ आमंत्रण आहे.

आज बहुतांश स्त्रीयांना लठ्ठपणा, रक्ताक्षय, मधुमेह, उच्चरक्तदाब, पिसीओडी, थॉयरॉडीझम, स्तन व गर्भशयाचा कर्करोग, मेनोपॉझमुळे हामीन्सम धील बदल, शारिरीक व मानसिक ताणतणाव असे अनेक प्रॉब्लेम असतात आणि त्यातल्या त्यात सततची पाठदुखी व कंबरदुखी. याला कारणे आहेत व्यायामाचा अभाव, बैठी जीवनशैली, अतिम ेदयुक्त व काबीदकेयुक्त पदार्थाचे सेवन, अतिप्रमाणात चहाकॉफ ीचे सेवन, मानसिक ताण-तणाव, गर्भनिरोधक गोळ्यांचा अतिवापर.

आता सर्व नियंत्रणात ठेवायचे असेल तर आपला आहार संतुलीत व नियंत्रीत असावा. एका स्त्रीला १९०० किलो कॅलरीज, ५५ ग्रॅम प्रथिनेची आवश्यकता असते. त्यामुळे आहार घेतांना दिवसभरात विविध अन्नपदार्थाचा वापर करावा.

सलाद, फळे, हिरव्या भाज्या, फळभाज्या यांचा जास्तीत जास्त वापर करावा. दूध, दही, ताक, पनीर, मोडआलेल्या उसळी, कडधान्ये, तसेच नाचणी, सोयाबीन (प्रोसेस केलेले), बाजरी, मका, मखाना या सर्व तृणधान्यांचा वापर करावा. रोज ३ ते ४ लिटर पाणी प्यावे. पाण्यासह निंबूपाणी, ताक, सुप, व्हेज सुप यांचा वापर करावा. नॉनव्हेजमध्ये अंड्याचा पांढरा भाग, मासे, चरबी विरहीत मटन खाऊ शकता. मेथीपावडर, लसून, लवकी, बदाम, अळीव, जवस, मखाना, रागी यांचा वापर करावा. तेल, तुप, तांदूळ, बटाटा, मैदा, साखर, साबुदाना, गोडपदार्थ, तळलेले पदार्थ, बेकरीतील पदार्थ खाणे टाळावेत.

तसेच या सर्व आहारासोबत व्यायामाला रोजच्या दिनचर्येत महत्वाचे स्थान दयावे. व्यायामामुळे वजन प्रमाणबध्द राहते. मधुमेह, उच्चरक्तदाब नियंत्रीत राहते. एच.डी.एल.(गुड कोलेस्टेरॉल)चे प्रमाण वाढते व हृदयरोगापासून संरक्षण मिळते. या सर्व नियमांचे पालन केल्यास स्त्रीया आपल्या शरीराची योग्यप्रकारे काळजी घेऊ शकतात.

के. के. गजभिये
उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय,गोंदिया

रेल्वेच्या धडकेने युवकाचा मृत्यू

गोरेगाव : गोंदिया-बल्लारशा लोहमार्गावरील गोरेगाव शिवारात लोहमार्ग ओलांडणाऱ्या इसमाला सुपरफास्ट रेल्वे गाडीने जबर धडक दिली. या घटनेत युवकाचा मृत्यू झाला. ही घटना ३ मार्चच्या रात्री ८ वाजता सुमारासची आहे. मंगल श्यामराव भेंडारकर (वय १९) रा. हलबीटोला असे मृताचे नाव आहे. सविस्तर असे की, गोरेगावच्या हलबीटोला येथील मंगल भेंडारकर हा रात्री ८ वाजता सुमारास गोरेगाव येथून घरी पायदळ जात होता. लोहमार्ग ओलांडत असताना सुपरफास्ट रेल्वेगाडी धडकली. रेल्वेच्या धडकेत मंगल भेंडारकर गंभीर जखमी झाला. दरम्यान त्याला उपचारकामी ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, त्याचा मृत्यू झाला. फिर्यादी जेकी भेंडारकरच्या फिर्यादीवरून गोरेगाव पोलिस ठाण्यात मर्ग दाखल करण्यात आला आहे.

घरफोडीच्या चोरट्यास ५ वर्षाचा सश्रम कारावास

गोंदिया: स्थानिक सिंधी कॉलनी येथील विजय भक्तांनी यांच्या घराचे दार तोडून ६६ हजार रूपयाचा ऐवज लंपास करणाऱ्या चोरट्याला जिल्हा न्यायालयाने ५ वर्षाचा सश्रम कारावास व २ हजार रुपए दंडाची शिक्षा ठोठावली आहे. हा निवाळा ३ मार्च रोजी मुख्य न्यायदंडाधिकारी अभिजित कुलकर्णी यांनी सुनावला आहे. धर्मराज दागोजी बावणकर (३०) रा.गौतमनगर असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

सविस्तर असे की, बाजपेयी चौक सिंधी कॉलनी येथील विजयकुमार भक्तांनी यांच्या घरी ११ व १२ फेब्रुवारी २०२२ च्या रात्री अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून ६६ हजार रूपयाचा ऐवज लंपास केला होता. या प्रकरणाच्या तपासादरम्यान आरोपी धर्मदास दागोजी बावणकर (३०) रा.गौतमनगर याला अटक करण्यात आली. दरम्यान त्याने भक्तांनी यांच्या घरी चोरी केल्याची कबूली दिली. सबळ साक्ष नोंदवून पोलिसांनी आरोपीविरूध्द जिल्हा न्यायालयात दोषारोप दाखल केले. या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान साक्ष व पुरावे तपासून तसेच वकिलांच्या युक्तीवादानंतर न्या.अभिजित कुलकर्णी यांनी आरोपीला दोषी ठरविले. या प्रकरणाचा निर्वाळा देत आरोपी धर्मराज बावणकर याला ५ वषोचा सर्शम कारावास व २ हजार रुपए द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोहवा जागेश्वर ऊईके यांनी केला. न्यायालयात सरकार पक्षाकडून अँड.सुरेश रामटेके यांनी युक्तीवाद केला. त्यात पोलिसातर्फे पोशि किरसान यांनी कामकाज पाहिले.

चुटिया येथे एक तास राष्ट्रवादीसाठी कार्यक्रम

गोंदिया: राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवशी राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष .जयंतराव पाटील यांनी "एक तास राष्ट्रवादीसाठी - आगामी महाराष्ट्राच्या विकासासाठी - प्रभावी, प्रगल्भ, तरुण, पुरोगामी विचारांसाठी' या उपक्रमाची संकल्पना मांडली होती.

त्या अनुसंगाने खासदार प्रफुल पटेल यांच्या निर्देशानुसार महिन्याच्या पहिल्या शनिवारी एक तास राष्ट्रवादी हा उपक्रम राबविला जात आहे. आज गोंदिया तालुक्यातील ग्राम चुटिया येथे प्रभू पटले यांच्या निवासस्थानी एक तास राष्ट्रवादीसाठी या उपक्रमाला माजी आमदार राजेंद्र जैन यांची उपस्थिती होती.

माजी आमदार राजेंद्र जैन म्हणाले कि, खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शासनाला विविध मागण्या करण्यात आलेल्या आहेत. घरगुती गॅस चे वाढलेले भाव, पेट्रोल व डिझेलच्या किमती मुळे गगनाला भिडलेली महागाई कमी करण्यात यावी. शासनाने काही दिवसापूर्वी धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस जाहीर केले. परंतु सदर बोनस अल्पसा असून ही एक प्रकारची शेतकऱ्यांची थट्टा आहे. कारण वाढलेले रासायनिक खताचे, किटकनाशकाचे, मजुरीचे व डिझेल चे भाव गगनाला भिडलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १००० रुपये धानाला बोनस देण्यात यावा. सध्या रब्बी पिकांचा हंगाम सुरू झाला आहे. त्यात उन्हाळी भात पिकाचे उत्पादन शेतकरी घेत असतो परंतु शेतकऱ्यांच्या पिकांना ८ तास विज देणे सुरु आहे. शेतकऱ्यांना रात्री शेतात जाणे हे धोकादायक आहे कारण जंगली जनावरांची व स्वापदाची व भिती असून अनेक दुखःद घटना घडलेल्या आहेत त्यामुळे दिवसा १२ तास विज मिळणे अति आवश्यक आहे. असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.

यावेळी सर्वश्री राजेंद्र जैन, केतन तुरकर, प्रभू पटले, सुनील पटले, शैलेश वासनिक, दुर्योधन मेश्राम, डॉ पटले, राजेश रहांगडाले, हौसलाल रहांगडाले, रौनक ठाकूर, दिनेश शरणागत, जयप्रकाश मेश्राम, देवेंद्र गौतम, हिरामण येडे, भीमराव नागवंशी, देवदास वैष्णव, मोहन मडावी, कृष्णा बिसेन, लक्ष्मी तुरकर, विनोदभाऊ पटले, सुनील पटले, पप्पू पटले, ओमप्रकाश गौतम, विनोद कोटेवार, वीरेंद्र गौतम, दिलीप वैद्य, रोहित पटले, रोशन मडावी, भाऊलाल गौतम, गोवर्धन पटले, नितिन चित्रिव, प्रवीण चित्रिव, राजेश्वर रहांगडाले, दिलीप पटले, गेंदलाल येडे, शेखर पटले, विजय वाघाडे, बुधा भगत, व गावातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत समुदाय आधारित संस्थाकरिता जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन

गोंदिया: ३ मार्च रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत मोबिलायझेशन व सेंसेटायझेशन घटकांतर्गत समुदाय आधारित संस्थाकरीता एक दिवशीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन प्रमुख जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट गोंदियामार्फत जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट तथा प्रकल्प संचालक आत्मा हिंदुराव चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक उदय खर्डेनवीस, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक अविनाश लाड, बँक ऑफ महाराष्ट्रचे जिल्हा व्यवस्थापक सुशीला सुरीन, कृषी विज्ञान केंद्र हिवराचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख सय्यद अली, नोडल अधिकारी तथा पुरवठा व मुल्यसाखळी तज्ञ कावेरी साळे, विभागीय अंमलबजावणी कक्ष स्मार्टचे अर्थसल्लागार सत्यपाल ठाकरे, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक दिपक बेदरकर, कृषी विज्ञान केंद्र हिवराचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश खेडीकर, गणेश ग्रामीण संस्थेचे विजय बहेकार, राजगिरी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या रजनी रामटेके आदी मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

या कार्यशाळेच्या माध्यमातून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यापासून ते समुदाय आधारित संस्थाचे व्यवसाय सुरू करणे व त्यांना योग्य मुल्यसाखळीमध्ये जोडण्याचे काम या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे, असे सांगून सर्व समुदाय आधारीत संस्स्थांनी विविध विभागाच्या योजनांचा पुरेपूर लाभ घ्यावा जेणेकरुन उत्पादीत मालाला योग्य भाव मिळून आर्थिक प्रगती साधता येईल, असे प्रास्ताविकातून हिंदुराव चव्हाण यांनी सांगितले. सदर स्मार्ट प्रकल्पाबाबत सविस्तर मार्गदर्शन करून या प्रकल्पाम ध्ये भाग घेण्याकरीता आवश्यक कागदपत्रांविषयी तसेच प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेविषयी कावेरी सावळे यांनी माहिती दिली. नाबार्डमाफ ंत शेतकऱ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देऊन कृषी पायाभुत सेवा सुविधा योजनेविषयी आविनाश लाड यांनी सविस्तर माहिती दिली. प्रकल्प आराखडा कसा असावा, प्रकल्प अहवालामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश करणे गरजेचे आहे तसेच समुदाय आधारीत संस्थांना लागणाऱ्या कागदपत्रांविषयी सत्यपाल ठाकरे यांनी मार्गदर्शन केले.

ग्रामपंचायत कार्यालय मांडोखाल
तालुका अर्जुनी/मोर. जिल्हा गोंदिया
निविदा सुचना क्र. २/२०२२-२३ (पहिली वेळ)

ग्रा.पं.मांडोखाल ता. अर्जुनी/मोर. जि.गोंदिया अंतर्गत सन २०२२-२३ या १.१५ वा वित्त आयोग योजनेंतर्गत (निधी २९२१-२०२२).अ) नाली दुरुस्ती-परसराम रामटेके ते दुधराम शेंडे यांच्या घरापर्यंत ब) नाली दुरुस्ती- युवराज करपते ते निलकंठ नेवारे यांच्या घरापर्यंत २.२५-१५ योजनेअंतर्गत दुधराम शेंडे ते वसंत लांडगे यांच्या घरापर्यंत रोड बांधकाम ३. स्वच्छ भारत मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन चे बांधकाम हे सदर कामे करण्यासाठी ऑफलाईन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर निविदा केवळ ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असून निविदा बाबत इतर सविस्तर माहिती ग्रा.पं.कार्यालय मांडोखाल चे सुचना फलकावर उपलपब्ध आहे.

निविदा वेळापत्रक

१) निविदा प्रसिद्धी	०८/०३/२०२३	५) निविदा	ग्रामपंचायत मांडोखाल खाते
२) निविदा ऑफलाईन भरणा	०८/०३/२०२३ ते १४/०३/२०२३ सायं.५.०० वा.पर्यंत	शुल्क व अनामत रक्कम भरणा करणे	क्र.97790100015726 बँकेचे नाव-बँक ऑफ बडोदा अर्जुनी/मोर. बँकेचे IFSC Code क्र. BARBODBARIN या या खात्यावर RTGS/NEFT Direct Transfer किंवा ग्रामपंचायत मांडोखाल येथे रोखीने भरणा करणे.
३) निविदा उघडणे	ग्रा.पं.मासिक सभेत शक्यतो		
४) निविदा भरणा पूर्व बैठक	नाही		

-स्वा/- ग्रामसेवक ग्रा.पं.मांडोखाल
-स्वा/- उपसरपंच ग्रा.पं.मांडोखाल
-स्वा/- सरपंच ग्रा.पं.मांडोखाल

महाराष्ट्र शासन
मृद व जलसंधारण विभाग,
बाघ कॉलोनी गोविंदपूर गोंदिया

ईमेल-Milsgondia@rediffmail.com
दुरध्वनी क्रं.०७१८२-२९५०६५

ई-निविदा सुचना क्र व-१/०९/सन २०२२-२०२३ (दुसरी वेळ)

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, गोंदिया हे खालील नमुद कामाकरिता रकाना क्रं.७ मध्ये नमुद योग्य वर्गवारातील पात्र कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाने संकेतस्थळ http://mahateders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित किंमत	इसारा/बयाना रक्कम	निविदा संघाची किंमत	काम पूर्ण करण्याचा कालावधी	कंत्राटदाराचा नोंदणीय किमान वर्ग
१	२	३	४	५	६	७
१	विशेष दुरुस्ती ल.पा. तलाव बघेडा ता.आमगांव जि.गोंदिया येथील काम.	रू.४८.८९ लक्ष	४९०००/- +१८% जीएसटी= रू.२३६०/-	रु.२०००/-	६ महिने	सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील नोंदणीकृत कंत्राटदार ५ व त्यावरील

अ) ई-निविदा उपलब्ध कालावधी-दिनांक: ०३/०३/२०२३ वेळ १८.५५ ते दिनांक:- १३/०३/२०२३ वेळ १७.३० वाजे आ) ई-निविदा उघडणे :-दिनांक:- १४/०३/२०२३ वेळ १७.४५ वाजे. ३) कार्यस्थळ पाहणी Geo-tagging :-दिनांक: ०६/०३/२०२३ वेळ ११.०० वाजे ते दिनांक:- १०/०३/२०२३ वेळ १७.३० वाजे. (सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

१) संकेतस्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या वेळापत्रकानुसार निविदा उघडण्याची तारीख व वेळेप्रमाणे कंत्राटदाराने किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहावे, अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

२) प्रत्येक निविदा धारकांना निविदा भरण्यापुर्वी कामाचे स्थळ, गौणखनीज क्षेत्र व ईतर महत्वाच्या कार्यक्षेत्राची पाहणी करणे बंधनकारक राहील. त्यानुसार Geo-tagging :-करुन निविदा व अटी शर्तीप्रमाणे Geo-tagging :-केल्याचा पुरावा निवीदेत सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा सदर कंत्राटदाराची निविदा ग्राहय राहणार नाही.

काळया बिबट्याची शिकार

नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पातील प्रकार,आरोपी ताब्यात

गोंदियाः- महाराष्ट्रात काळया बिबटयाचे अस्तित्व दुर्मिळ असतानाच नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पात जुलै २०२१ मध्ये नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पातील बफर क्षेत्रात काळया बिबट असल्याचे समोर आले होते. त्या काळ्या बिबट्याची शिकार जानेवारी २३ मध्ये करणाऱ्या आरोपींना वनविभागाने चार दिवसापुर्वी पकडल्याची पुष्टी नागझिरा नवेगावबांध व्याघ्रप्रकल्पाचे विभागीय वन अधिकारी प्रदिप पाटील यांनी केली.

डेहरादून येथील भारतीय वन्यजीव संस्थेचे शास्त्रज्ञ बिलाल हबीब यांनी "ट्विटर'वर ते प्रसिद्ध केल्यानंतर व्याघ्रप्रकल्प व्यवस्थापनाने काळया बिबटयाचे अस्तित्व मान्य केले होते. मात्र गेल्या पावणेदोन वर्षापासून या व्याघ्रप्रकल्पात ठाण मांडून असलेल्या काळया बिबटयाला व्याघ्रप्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना निसर्गाचे हे देणे सांभाळता आले नाही. आणि देवरी तालुक्यातील मंगेझरी व पालांदूर येथील गावकऱ्यांनीच काळया बिबटयाचा बळी घेतल्याचे एका प्रकरणाचा तपास करतांना उघडकीस आले आहे. त्या आरोपीमध्ये शामलाल ढिवरू मडावी, दिवारू कोल्हारे, मानिक दारसू ताराम, अशोक गोटे, हे चारही राहणार मंगेझरी ता. देवरी,जि.गोंदिया यांचा समावेश आहे.

जानेवारी २३ मध्ये त्यांनी फास लावला आणि बिबट फासात अडकला. त्याने स्वतःला सोडवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला, पण तो अयशस्वी ठरला. फासात अडकूनही तो मरण पावला नाही म्हणून मंगझेरीतील या गावकऱ्यांनी त्याला भाल्याने मारले. १३ जानेवारीलाच ही घटना घडली. तत्पूर्वी १२ जानेवारीला कॅमेरा ट्रॅपमध्ये त्याचे छायाचित्र आढळले होते.त्याच्या शिकारीची कुणकुण होती. पण कुणीही अवाक्षर काढले नाही. मात्र, खात्यातीलच एका अधिकाऱ्याने या संपूर्ण प्रकरणाचा पाठपुरावा करीत छडा लावला.त्यांच्या या चौकशीमुळे वाघासह इतरही वन्यप्राण्याच्या शिकारीही उघडकीस आल्या असून आरोपींना बेड्या ठोकण्यात आले आहे.

ट्रॅप कॅमेऱ्याने टिपले दृश्य

नागझिरा-नवेगाव टायगर रिझर्व्ह क्षेत्रात ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरा लावण्यात आले आहेत. या अभयारण्याचे क्षेत्र ६५० चौरस किलोमीटर आहे. ब्लॅक लेपर्ड हा आपल्या सोबत्यासह नागझिरा-नवेगाव टायगर रिझर्व्ह (एनएनटीआर) अभयारण्यातील ट्रॅप कॅमेऱ्यात टिपला गेला होता. या कॅमेऱ्यात झालेल्या नोंदी डब्ल्यूआयआयकडे व भारतीय वन्यजीव संस्थेकडे पाठविल्या जातात. भारतीय वन्यजीव संस्थेतील वैज्ञानिक बिलाल हबीब यांनी ट्विटर हँडलवर बिबट्याच्या जोडीचे छायाचित्र शेअर केल्यानंतर ही बाब उघडकीस आली होती.

आरोग्यवर्धिनी केंद्राच्या लोकार्पणाचा मुहुर्त कधी?

गोंदिया : जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यात चिखली येथे गेल्या दोन वर्षापासून आरोग्यवर्धिनी केंद्राची सुसज्ज इमारत तयार झाली. रंगरंगोटीदेखील झाली आहे. परंतु, अजूनर्यंत आरोग्य केंद्र सुरू झाले नाही. त्यामुळे किती दिवस शोभेची वास्तूच म्हणून ही इमारत उभी राहील, असा प्रश्न परिसरातील नागरिकांना पडला आहे.

सडक अर्जुनी तालुक्यात १०८ गावे असून दोन ग्रामीण रुग्णालये, चार प्राथमिक आरोग्य केंद्रे, तीन आयुर्वेदिक दवाखाने, एक अलोपॅथिक दवाखाना व २९ उपकेंद्रे आहेत. चिखली येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची मागणी फार जुनी होती. त्यामुळे चिखली येथे पाचवे आरोग्य केंद्र मंजूर झाले. दोन वर्षापूर्वी इमारतही तयार झाली. परंतु, तयार झालेल्या इमारतीत अजूनपर्यंत कामकाज सुरू झाले नाही. आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य सेवेअंतर्गत मानवविकास योजना, जननी शिशू सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व योजना, राष्ट्रीय कुटुंब कार्यक्रम, माता-बाल संगोपन कार्यक्रम, कीटकजन्य, जलजन्य आजार,कुष्ठरोग, क्षयरोग निदान, रक्तदाब, मधुमेह तपासणी व इतर उपक्रम, कार्यक्रम राबविले जातात.

सडक अर्जुनी तालुक्यातील शेंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात २७ गावे असून ६ उपकेंद्र आहेत. डव्वा केंद्रात १८ गावे असून ७ उपकेंद्र आहेत. पांढरी केंद्रात २२ गावे असून ७ उपकेंद्र आहेत आणि खोडशिवनी केंद्रात ३६ गावे असून ९ उपकेंद्र आहेत.

खोडशिवनी केंद्राअंतर्गत चिखली, कोकणा, फुटाळा, सौंदड, पळसगाव/राका, तिडका, बोपाबोडी, घाटबोरी/को. व खोडशिवनी या उपकेंद्रांचा समावेश आहे. त्यापैकी कोकणा, चिखली हे उपकेंद्र खोडशिवनी पासून २० ते २५ किलोमिटर अंतरावर आहेत.

चिखली येथील आरोग्यवर्धिनी केंद्र लवकर सुरू झाल्यास कोकणा, चिखली व इतर काही उपकेंद्रातील नागरिकांना खोडशिवनी येथे जावे लागणार नाही. परंतु, आता चिखली येथील आरोग्यवर्धिनी केंद्र केव्हा सुरू होईल की फक्त शोभेचीच वास्तू राहील, असा प्रश्न परिसरातील नागरिकांना पडला आहे.

याबाबत चिखलीच्या सरपंच चित्रा भैंडारकर म्हणाल्या की, मागील दोन वर्षापासून चिखली येथे आरोग्यवर्धिनी केंद्राची सुसज्ज इमारत तयार झाली असून रंगरंगोटीही झाली आहे. परंतु, प्रत्यक्षात कामकाज सुरू झाले नाही. प्रशासनाने लवकरात लवकर कामकाज सुरू करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांची आहे.

मनुष्यबळाविषयी ग्रामविकास विभागाला मागील दोन वर्षापासून प्रस्ताव पाठविले आहे. अजूनपर्यंत मंजुरी मिळाली नाही. पदे मंजूर होताच लवकरात लवकर चिखली येथील आरोग्यवर्धिनीनी केंद्राचे कामकाज सुरू करण्याचा प्रयत्न आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी सांगितले.

९ केंद्र,६४ आरोग्य उपकेंद्राची प्रतीक्षा

५ वर्षापासून प्रस्ताव रेंगाळत: शासनाकडून अद्याप मान्यता नाही

गोंदिया: जिल्ह्याची वाढती लोकसंख्या आणि जिल्ह्यातील आरोग्य संस्था लक्षात घेऊन ९ प्राथमिक आरोग्य केंद्र अणि ६४ उपकेंद्रांचा प्रस्ताव पाच वर्षापुर्वी मांडण्यात आला होता. तर जिल्हा परिषदेच्या जिल्हा नियोजन समितीनेही या प्रस्तावाला मान्यता दिली होती. मात्र शासनाकडून अद्याप या प्रस्तावाला मंजूरीच देण्यात आली नाही. त्यामुळे गेल्या पाच वर्षापासून हा प्रस्ताव रेंगाळलेला असून जिल्हावासीयांना या आरोग्य केंद्र व उपकेंद्राची प्रतीक्षा आहे.

दिवसेंदिवस जिल्ह्याची लोकसंख्या वाढतीवर आहे. तर विविध नवीन आजारही डोकेवर काढत आहेत. विशेष म्हणजे अनेक गावात आरोग्य व्यवस्थेची वाणवा असल्याने त्या गावातील नागरिकांना तालुका किंवा जिल्हा रुग्णालयाची पायपीट करावी लागते. तेव्हा जिल्ह्यात ९ आरोग्य केंद्र व ६४ उपकेंद्राची निर्मिती करण्याचा ठराव जिल्हा परिषदेच्यावतीने घेण्यात आला होता. त्यामुळे दिलेल्या अटीनुसार जिल्ह्यातील आरोग्य संस्थांची संख्या वाढविण्याचा निर्णय जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने घेत ९ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ६४ उपकेंद्रांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीसमोर मांडण्यात आला. जिल्हा नियोजन समितीने नवीन आरोग्य संस्थांच्या प्रस्तावाला मंजूरी दिली, तर शासनाच्या मंजुरीसाठी सदर प्रस्तावर वरिष्ठस्तरावर आले होते. मात्र, या प्रस्तावावर अद्यापही शिक्कामोर्तब झाले नसल्याने नवीन आरोग्य केंद्र व उपकेंद्रांची निर्मिती कधी होणार? हा प्रश्न आता निर्माण होऊ लागला आहे. असे असले तरी याकडे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचेही दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव आतापर्यंत रेंगाळला असून याकडे लक्ष देत त्वरित केंद्र व उपकेंद्राची निर्मिती करावी अशी मागणी आता जोर धरत आहे.

प्रस्तावित आरोग्य केंद्र

जिल्हा परिषदेकडून घेण्यात आलेल्या ठरावानुसार आरोग्य केंद्राची गरज असलेल्या गावांची निवड करण्यात आली असता जिल्ह्यातील चुलोद, टेमणी, ढाकणी, पांढराबोडी, चिरचाळबांध, पुराडा, मोहगाव बु.कोसमतोंडी, पिपरिया, हिराटोला येथे केंद्रे प्रस्तावित आहेत.

असे आहेत उपकेंद्र

प्रस्तावित असलेल्या उपकेंद्रानुसार गोंदिया तालुक्यातील लोहारा, तुमखेडा बु., बाजारटोला,पिंडकेपार, घिवारी, चांदनीटोला, खळबंदा, फत्तेपूर, कटंगी, आंभोरा, बरबसपुरा, मोगरा, पांजरा, शिवनी, कोचेवाही तर आमगाव तालुक्यातील सीतेपार, बोरकन्हार, सुरकुडा, सालेकसा तालुक्यातील मुरकुडोह, कोटजांभोरा, बिंझली, पांढरवानी, बोदलबोडी, विचारपूर, गांधीटोला, पाऊलदौना, देवरी तालुक्यातील चांदलमेटा, गाडेगावल, पळसगाव, सुंदरी, इस्तारी, पिपरखारी, आमगाव, मुरपार, सडक अर्जुनी तालुक्यातील कान्हेरी, धानोरी, कोहडीटोला आदर्श, रेंगेपारल, राका, कोसबी, पुतडी, वडेगाव, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गौरनगर, नवनीतपूर, गंधारी, खामखुर्रा, कवठा, दाभणा, सिरेगावबांध, कान्हाळगाव, गोरेगाव तालुक्यातील जांभुळपाणी, दवडीपार, श्रीरामपूर, घोटी, निंबा, बोरगाव तर तिरोडा तालुक्यातील जामुनिया, बेरडीपार, गंगला, बोरा, भुराटोला या गावांचा समावेश आहे.

देसाईगंज एसडीओसह सात उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची होणार चौकशी

नागपूरच्या विभागीय आयुक्तांकडे आदेश धडकला

गडचिरोली:- नागपूर विभागातील तब्बल आठ उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून कारवाई करण्यासाठी महसूल व वन विभागाचे अवर सचिव सुरेश नाईक यांनी ५ जानेवारीला नागपूर विभागीय आयुक्तांना निर्देश दिले असून यात देसाईगंज येथील उप विभागीय अधिकाऱ्याचा समावेश असल्याने महसूल विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे.

शर्तभंग केल्याची सकृतदर्शनी पुरावे असतांना देखील आर्थिक गैर व्यवहार करून हेतुपुरस्पर दुर्लक्ष केले आहे. शर्तीने धारण केलेल्या कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग-२ धारणाधीकारावर किंवा भाडेपट्टीवर प्रदान केलेल्या शेत जमिनीचे भोगवटदार वर्ग-१ मध्ये देय रूपांतरण अधिमुल्य प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रातील शेतीच्या दराप्रमाणे येणाऱ्या किमतीच्या ५०% एवढी रक्कम घेऊन आदेश पारित करण्यापूर्वी अधिनियमातील नियम ३ (२) वरील उप-नियम(१) मध्ये अटी व शर्त भंग झाले नसल्याबाबत सक्षम महसूल अधिकाऱ्याचा मोका चौकशी अहवाल घेणे बंधनकारक होते.

८ मार्च २०१९ ला निर्गमित झालेल्या महसूल व वन विभागाच्या अधिसूचनेतील तरतुदींचे तंतोतंत अनुपालन न करता शासनाचा करोडो रुपयाचा महसूल बुडविण्यास कारणीभूत असणाऱ्यां अधिकाग्रांची विभागीय चौकशी करून बुडविलेला महसूल त्यांच्या कडूनच सक्तीने वसूल करून तात्काळ निलंबित करण्याबाबत गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज येथील उप विभागीय अधिकारी यांच्या विरुद्ध संदर्भ क्रमांक ३५०/२०२२ अन्वये ५ जानेवारी २०२३ ला नागपूरच्या विभागीय आयुक्तांकडे पत्र पाठवले आहे.

या पत्रात उप विभागीय अधिकारी सावनेर, उप विभागीय अधिकारी वरोरा, उप विभागीय अधिकारी देवरी, निवासी उपजिल्हाधिकारी नागपूर, उप जिल्हाधिकारी सांगोला व अतिरिक्त जिल्हाधिकारी कारंजा घाडगे यांचाही समावेश असुन या आठही उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन तात्काळ उचित कार्यवाही करुन शासनाला अवगत करण्याचे निर्देश दिले आहेत.

अल्पवयीन मुलीचा बालविवाह थांबविण्यास प्रशासनाला यश

गोंदियाः- गोंदिया ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या एका गावात अल्पवयीन मुलीचा विवाह सोहळा होत असल्याची माहिती कळताच दामिनी पथक, महिला व बालविकास विभागाचे जिल्हा बाल सरंक्षण कक्ष आणि गोंदिया ग्रामीण पोलिसांच्या पथकाने सदरस्थळी दाखल होत १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे होत असलेले लग्न थांबवले. दामिनी पथकाला जिल्ह्यातील एका गावामध्ये १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा बालविवाह ०२/०३/२०२३ रोजी आयोजीत करण्यात आल्याची माहिती मिळाली.त्यानुसार दामिनी पथक, पोलीस स्टेशन गोंदिया ग्रामिण, महिला व बाल विकास विभाग जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांनी संयुक्तपणे सदर ठिकाण गाठले असता विवाहाची पूर्वतयारी सुरु असल्याचे दिसून आले. लग्न मंडप उभारण्यात आला होता. मुलीची योग्य ती चौकशी केली असता ती मुलगी १६ वर्ष ०२ महीण्याची असल्याचे निदर्शनास आल्याने मुलीचे व मुलाचे पालकांना समुपदेशन करून सदर नियोजीत विवाह रद्द करण्यात आला. सदर मुलीला महिला बालकल्याण समिती समोर हजर करुन मुलीसह तिच्या आईला समुपदेशन करण्यात आले.सदरची कारवाई पोलीस अधिक्षक निखील पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, यांचे मार्गदर्शनाखाली दामिनी पथकचे मपोउपनि प्रियंका पवार, पोशि राजेंद्र अंबादे, रमेंद्र बावनकर मपोशि निशा बंसोड, पुनम मंजुटे, नेहा पाचे पोलीस स्टेशन गोंदिया ग्रामिणचे आसाराम चव्हान, प्रदिप गणवीर, दपक लिल्हारे, राकेश इंदुरकर आणि मनिषा मोहुले, यांनी संयुक्तपणे कार्यवाही करून सदर बालविवाह थांबविल्याने वरिष्ठांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

अपघात टाळण्यासाठी धोकादायक वळणावर लावले पोलिसांनी रेडीयम

गोंदियाः- देवरी तालुक्यातील चिचगड पोलिसांनी रस्ते अपघात टाळण्यासाठी १८५ झाडांना व १२५ विद्युत खांबांना रेडियम व दिशा दर्शक फलक लावून जनजागृती करण्यात आली.सर्वसामान्य नागरिकांमध्ये पोलिसांप्रती आपुलकी निर्माण व्हावी,यासाठी जिल्हा पोलिसातर्फे कम्युनिटी पोलिसींगतंर्गत विविध उपक्रम जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे,अप्पर पोलीस अधिकारी अशोक बनकर,उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

कम्युनिटी पोलिसिंगच्या माध्यमातून अति दुर्गम ,नक्षलग्रस्त भागातील विद्याथी,जनतेच्या हिताकरिता विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत.त्याचाच एक भाग म्हणून चिचगडचे ठाणेदार शरद पाटील यांच्या नेतृत्वाखाली चिचगड पोलिसांनी रस्त्यांवरील अपघात टाळण्यासाठी वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी १८५ झाडांना व १२५ विद्युत खांबाना तसेच धोकादायक वळणावर रेडीयम लावण्यात आले.

आमगाव नगर परिषदेबद्दल शासनाच्या असलेल्या भूमिकेचा मुंडण करुन निषेध

- **न्यायालयीन प्रकरण राज्य शासनाने तात्काळ निकाली काढण्याची केली मागणी**
- **तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन सादर**

गोंदिया :- शासनाच्या दुर्लक्षित धोरणामुळे गोंदिया जिल्ह्यातील आठ गावे आमगाव,बनगाव, किडंगीपार, माली, पदमपुर, कुंभारटोली, बिरसी, रिसामा ही आठ गावे गोंदिया जिल्ह्यात असून विकासापासून वंचित आहेत. राज्य शासनाच्या न्यायालयीन प्रकरणामुळे अद्याप निर्णय घेण्यात आले नाही.त्यामुळे आठ वर्षापासून ही गावे विकासापासून वंचित आहेत.

नागरिकांनी शासनाने आमगाव नगर परिषदची आठ गावांचे पालकत्व हरविल्याची खंत वेक्त करीत महात्मा गांधी चौक, तहसील कार्यालय परिसर येथे डोके मुंडन करुन शोक व्यक्त केला.व न्यायालयीन प्रकरण निकाली काढुन न्याय मागणीसाठी नागरिकांनी तहसील कार्यालय गाठून निवेदन सादर केले. आमगाव, बनगाव, किडंगीपार,माली, पदमपुर, कुंभारटोली, बिरसी, रिसामा ही आठ गाव जिल्हा गोंदिया महाराष्ट्र राज्य भागात आहेत. सदर आठ गावातील लोकसंख्या जवळपास ४० हजार आहे. महाराष्ट्र सरकारने मागील आठ वर्षांपासून नगर पंचायत ते नगरपरिषद स्थापनेचा वाद निर्माण करून सवीच्च न्यायालयात याचिका दाखल करून प्रकरण न्यायप्रविष्ट ठेवले आहे.

सदर न्याय प्रविष्ट प्रकरणामुळे राज्य सरकारने प्रशासक कारभार सुरू ठेवला आहे.यामुळे प्रलंबित न्यायप्रविष्ट असल्याने सन २०१४ नंतर याठिकाणी सार्वत्रिक निवडणूक झाली नाही. लोकप्रतिनिधी निवडणूक झाली नसल्याने व योजना विकास निधी मंजूर करण्यात आले नाही त्यामुळे या भागाचा विकास झाला नाही.सदर भागाचा भौगोलिक परिस्थिती पाहता या ठिकाणी महाराष्ट्र राज्य सरकारने मागील १३ वर्षांपासून या ठिकाणी राज्य व केंद्र सरकारच्या योजना बंद करुन नागरिकांना मूलभूत विकासापासून रोखले आहे. राज्य व केंद्र सरकारच्या योजनांची अंमलबजावणी करुन विकास करावे ही मागणी नगर परिषद संघर्ष समितीने केली आहे.

गांगला केंद्रप्रमुख पटले ९ हजाराची लाच घेतांना जाळ्यात

गोंदियाः- तिरोडा पंचायत समितीअंतर्गत येत असलेल्या शिक्षण विभागातील गांगला केंद्राचे केंद्रप्रमुख व विषय शिक्षक धनपाल श्रीराम पटले (वय ४७,रा. नेहरू वार्ड, तिरोडा यांना ९ हजार रुपयाच्या लाचेची मागणी करुन स्विकारल्याप्रकरणी ३ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.तक्रारदार हा भंडारा जिल्ह्यातील गणेशनपूर येथील रहिवासी असून हे शिक्षक असल्याने प्रकृती ठीक नसल्याने माहे डिसेंबर २०२२ व जानेवारी २०२३ मध्ये वैद्यकीय रजेवर होते. प्रकृती ठीक झाल्यावर ते जानेवारी २०२३ मध्ये कर्तव्यावर हजर झाले. परंतु या वैद्यकीय रजा कालावधीतील त्यांचा पगार काढण्यात आला नसल्याने त्यांनी वैद्यकीय रजा मंजुर करुन या कालावधीतील पगार काढणेकरिता गटशिक्षण अधिकारी,पंचायत समिती तिरोडा यांचेकडे कागदपत्रासह अर्ज केला. परंतु त्यांनी वैद्यकीय रजा मंजूर करुन पगार काढला नाही.

यातील आरोपी केंद्रप्रमुख याने तक्रारदारास गटशिक्षण अधिकारी यांचेकडून त्यांची वैद्यकीय रजा मंजूर करुन त्या कालावधीतील पगार काढून देणेकरिता १०,००० रु. लाच रकमेची मागणी करुन तळजोळी अंती ९,००० रु. लाच रकमेची मागणी करुन ०३/०२/२०२३ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपीने तक्रारदाराकडुन जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा, गांगला येथे लाच रक्कम स्विकारल्याने ताब्यात घेण्यात आले. आरोपीविरुध्द तिरोडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदवण्याची प्रकिया सुरु करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर,अप्पर पोलीस अधिक्षक मधुकर गिते, पोलीस उप अधीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या मार्दर्दर्शनात पोलीस निरीक्षक सारंग मिराशी,पोलीस निरीक्षक अतुल तवाडे,स.फौ. विजय खोब्रागडे, पो. हवा. संजय बोहरे, नापोशी संतोष शेंडे,मंगेश काहालकर, संतोष बोपचे, अशोक कापसे, चालक दीपक बतबर्वे यांनी पार पाडली.

आरोग्य उपकेंद्रातील वृक्षांची कत्तल करुन विक्री

दोषींवर कारवाईची मागणी, सेजगाव येथील प्रकार

गोंदिया : तिरोडा तालुक्यातील सेजगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात असलेल्या वृक्षांची कत्तल करुन त्या वृक्षांची विक्री केल्याचे प्रकरण समोर आले आहे. विशेष म्हणजे येथील एका आरोग्य सेविकेचे काही दिवसापूर्वीच पदोन्नतीवर स्थानांतरण झाले. व त्या कर्मचाऱ्यानेच या वृक्षांची कत्तल करुन विक्री केल्याची चर्चा गावात आहे. परिणामी या विषयाला घेवून ग्रामपंचायतीच्या सभेत चर्चा करुन प्रकरणाची दखल घेण्यात आली. तसेच तक्रार करण्याचे निर्देश देण्यात आले. शासनाच्या वृक्ष लागवड योजनेला हरताळ फासण्याचे काम झाल्याने दोषींवर कारवाई व्हावी, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

सविस्तर असे की, सेजगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात सद्या स्थितीत एक आरोग्य सेविका तसेच एक सीएचओ कार्यरत आहेत. तर काही दिवसापूर्वीच एका आरोग्य सेविकेचा पदोन्नतीपर स्थानांतरण झाले. पदोन्नतीपर स्थानांतर झालेल्या सेविका या मागील १५ ते १७ वर्षापासून याच उपकेंद्रात कार्यरत होत्या. दरम्यान त्यांनीच या झाडांची लागवड केली होती. मात्र स्थानांतरण झाल्यानंतर अचानक त्या झाडांची कत्तल करुन विक्री केल्याचे प्रकार उघडकीस आले आहे. ही बाब ग्रामपंचायतीच्या लक्षात आली. दरम्यान प्रकरणाची सरपंच, उपसरपंच व ग्रा.पं.सदस्यांनी चौकशी केली तसेच स्थानांतरण झालेल्या आरोग्य सेविकेला विचारपूस केली असता, मी झाडांची लागवड केली होती, म्हणून मी कापून विक्री केली, अशी माहिती ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी दिली आहे. आज ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत हा विषय चर्चेला आला. दरम्यान शासकीय जागेतील वृक्षांची कत्तल करता येत नाही, हे माहित असतांनाही एका शासकीय कर्मचाऱ्याने हा प्रकार केल्याने त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करण्यात यावी, यासाठी तक्रार करणार असल्याचेही सांगितले आहे. शासन एकीकडे वृक्षा लागवडीसाठी विशेष मोहिम राबविते. तसेच वृक्षांचे संवर्धन करुन त्याचे जतन करण्यासाठी निधीची तरदूत करुन नागरिकांमध्ये जनजागृती करते. मात्र या मोहिमेला हरताळ फासण्याचे काम झाल्याने घटनेची सत्यता तपासून दोषीवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे.

प्राथ. आरोग्य उपकेंद्रात आंबा, लिंबु व इतर प्रजातीचे झाडे होती. दरम्यान फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या शनिवारी आपण कर्तव्यानंतर घरी गेलो. त्यानंतर सोमवारी आरोग्य उपकेंद्रात आल्यानंतर झाडांची कत्तल झाल्याचे दिसून आले. तसेच परिसरात वृक्षही दिसून आले नाही. या बाबतची रितसर तक्रार प्राथमिक आरोग्य केंद्र इंदोरा येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.

- शेख मॅडम, सामुदायिक वैद्यकीय अधिकारी, प्राथ. आरोग्य उपकेंद्र, सेजगाव

आरोग्य उपकेंद्रातील प्रकरण काही दिवसापूवी उजेडात आले. या बाबतची पुर्ण माहिती घेण्यात आली आहे. तसेच आजच्या सभेत यावर चर्चाही करण्यात आली. वृक्षांची कत्तल करुन त्याची विक्री करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने संबंधितांना तक्रार करण्यात येईल.

- सौ. उषा कठाणे, ग्रा.पं.सरपंच, सेजगाव

आदिवासी बांधवांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पोलिस विभाग प्रयत्नशील:पाटील

गोंदिया: जिल्ह्यातील अतिसंवेदनशील असलेल्या दुर्गम भागातील आदिवासी जनतेला शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देवून त्यांना विकासाच्या मुख्यप्रवाहात आणाण्यासाठी पोलिस विभाग प्रयत्नशील आहे. मिशन शिखर, दादालोरा अशा अनेक योजनांतून आदिवासी बांधवांना जोडण्याचे काम पोलिस करीत आहे. जिल्ह्याच्या नक्षलग्रस्त भागातील प्रत्येक आदिवासींचे आधारकार्ड, बँक अकाउंट व जात प्रमाणपत्र हे तीन दाखले तत्परतेने बनवून देण्याची जबाबदारी गोंदिया पोलिसांनी घेतली आहे. या कागदपत्राच्या आधारे त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून दिला जाणार असल्याचे गडचिरोली परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक संदीप पाटील यांनी शुक्रवारी (दि.३) येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

पोलिस अधीक्षक कार्यालयातील सभागृहात आयोजित पत्रपरिषदेत ते बोलत होते. यावेळी पोलिस अधिक्षक निखिल पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक अशोक बनकर उपस्थित होते. यावेळी पोलिस अधीक्षक पिंगळे यांनी माहिती देतांना सांगितले की, १५० आदिवासी तरुणांना पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात आले. त्यातील ३८ ते ४० तरुण हे पोलिस भरतीत चांगल्या गुणांनी समोर आले आहेत. आता लेखी परीक्षेतील यशानंतर किती पोलिस म्हणून पुढे येतात हे कळेल. मिशन शिखर अंतर्गत देवरी येथे ४० पैकी १७ युवक जेईईई साठी निवडले गेले आहेत. गोठणगाव व बिजेपार भागातील विद्याथी फार चांगली मेहनत घेवून पुढे येत आहे.

गडचिरोली भागात विकास व प्रगती या प्रकल्पासारखे कार्य केले जात आहे. गोंदिया जिल्ह्यात युवकांसाठी साहित्य किट वाटप, रोजगार मेळावे, कौशल्य विकास प्रशिक्षण सारखे अनेक कार्य सुरु आहेत. विशेष म्हणजे रोजगार मेळाव्यातून सुरक्षा रक्षकासाठी १२८ युवकांना नोकरी प्राप्त झाली आहे. यासह नुकत्याच सुरू करण्यात आलेल्या चॉली स्कॉडचे चांगले परिणाम नजिकच्या काळात दिसून येतील. शहरातील वाहतूकीच्या बाबतीत निर्णय घेतला गेला असून ३ तासासाठी पार्कीग प्लाझामध्ये कुठलेही शुल्क आकारले जाणार नाही. हळूहळू याचा प्रचार प्रसार होऊन वाहन लावण्याची लोकांना सवय लागेल असेही पोलिस अधिक्षक पिंगळे म्हणाले.